रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक २८
www.ramprahar.com
गुरुवार १४ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## ‘मुंबई-गोवा महामार्गाची कामे तातडीने पूर्ण करा’



**मुंबई** : गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गाची कामे तातडीने पूर्ण करावीत. महामार्गावरील इंदापूर-माणगावनजीकच्या रस्त्यासाठी लागणाऱ्या कामांसाठी २१ कोटींचा निधी उपलब्ध करणार असून अपुरी कामे पूर्ण करण्यासाठी सार्वजनिक बांधकाममंत्री यांच्या अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती नेमून कामे मिशन मोडवर पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले. मंत्रालयात मुंबई-गोवा महामार्गाविषयी आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीला सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, खासदार सुनील तटकरे, वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ.पी. गुप्ता, नियोजन विभागाचे सचिव डॉ. राजगोपाल देवरा उपस्थित होते. गणेशभक्तांचा प्रवास सुखकर होण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्र्यांनी दिले.

### अंतरंग

बेस्ट कामगारांच्या निवडणुकीत भाजपप्रणित पॅनल मैदानात/२
जि.प.ची सिद्धेश्वर शाळा झाली दीडशे वर्षांची!/५
ॲथलेटिक्स मीटमध्ये जिंदल विद्यालयाचे यश/८

# भारत माता की जय!

## पनवेलमध्ये भव्य तिरंगा यात्रा ▌ स्वातंत्र्य दिनानिमित्त देशभक्तीचा जागर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

देशाच्या स्वातंत्र्य दिनाच्या पार्श्वभूमीवर भारतीय जनता पक्ष पनवेल शहर मंडळाच्या वतीने बुधवारी (दि. १३) पनवेलमध्ये भव्य तिरंगा यात्रेचे आयोजन करण्यात आले. या वेळी तिरंगा हातात घेऊन भारतमातेच्या जयघोषात संपूर्ण शहर देशभक्तीच्या वातावरणाने न्हाऊन निघाले.

तिरंगा यात्रेत प्रमुख मान्यवर म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांच्यासह स्थानिक स्वराज्य संस्थेचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी सहभाग घेतला.

हातात तिरंगा झेंडा, जवानांच्या गौरवार्थ अभिमान फलक आणि ढोलताशाच्या गजरात यात्रेची सुरुवात पनवेल शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून शिवरायांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करून झाली. पुढे आदर्श हॉटेल, विरूपाक्ष मंदिर, जय भारत नाका, टिळक रोड अशा मुख्य मार्गांवरून मार्गक्रमण करत स्वातंत्र्यवीर सावरकर चौक येथे यात्रेचा समारोप झाला. संपूर्ण मार्गात ठिकठिकाणी नागरिकांनी यात्रेचे उत्स्फूर्त स्वागत केले.



यात्रेदरम्यान भारत माता की जय, वंदे मातरम् आणि जय हिंदच्या घोषणांनी वातावरण दुमदुमून गेले होते. पनवेलकर नागरिकांमध्ये देशभक्तीची ऊर्जा आणि एकात्मतेची भावना जागवणारा हा सोहळा अविस्मरणीय ठरला.

या रॅलीत प्रमुख मान्यवरांसह माजी शहराध्यक्ष अनिल भगत, ज्येष्ठ नेते जयंत पगडे, श्रीनंद पटवर्धन, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, चारुशीला घरत, उपाध्यक्ष गणेश कडू, मयुरेश नेतकर, शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, वर्षा ठाकूर, महिला मोर्चा अध्यक्ष रूचिता लोंढे, माजी नगरसेवक मनोहर म्हात्रे, अजय बहिरा, प्रभाकर बहिरा, तेजस कांडपिळे, सुनील बहिरा, माजी नगरसेविका अनुराधा ठोकळ, हेमलता म्हात्रे, डॉ. सुरेखा मोहोकर, प्रीती जॉर्ज, सारिका भगत, नीता माळी, सुलोचना कल्याणकर, नलिनी शेलार, संजय जैन, अमरीश मोकल, प्रीतम म्हात्रे, केदार भगत, रूपेश नागवेकर, माजी पं.स. सदस्य निलेश पाटील, विनायक मुंबईकर, स्वप्नील ठाकूर, के.सी. पाटील, रोहित जगताप, स्वाती कोळी, लीना पाटील, कोमल कोळी आदी पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते आणि प्रतिष्ठित नागरिक सहभागी झाले होते. (पान २ वर..)

# गणेशोत्सवात ऑपरेशन सिंदूर, स्वदेशीविषयी जनजागृती करा

## मुख्यमंत्री फडणवीसांचे सार्वजनिक मंडळांना आवाहन



**मुंबई : प्रतिनिधी**

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी या वर्षीच्या गणेशोत्सवामध्ये भारताने जगाला ऑपरेशन सिंदूरद्वारे दाखविलेली शक्ती आणि स्वदेशी वस्तूंच्या वापराविषयी जनजागृती करावी. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी प्रशासनासोबत समन्वय ठेवून हा गणेशोत्सव शांतता व उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करावा, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी करीत ऑपरेशन सिंदूरवर आधारित देखावे हे जवानांसाठी समर्पित असण्याची अपेक्षाही व्यक्त केली.

सार्वजनिक गणेशोत्सवानिमित्त कायदा व सुव्यवस्था बैठकीचे आयोजन सह्याद्री अतिथीगृह येथे बुधवारी (दि. १३) करण्यात आले होते. त्या वेळी मुख्यमंत्री फडणवीस आढावा घेताना बोलत होते. त्यांनी गणेशोत्सवादरम्यान भाविकांना कुठल्याही प्रकारे अडचणी येणार नाहीत, त्या पद्धतीने कार्यवाही करण्याच्या सूचनाही प्रशासनाला दिल्या.

बैठकीस उपमुख्यमंत्री अजित पवार, कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यतामंत्री मंगलप्रभात लोढा, गृह (ग्रामीण) राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर, गृह (शहरे) राज्यमंत्री योगेश कदम, मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते.

सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाप्रमाणे मूर्तीकरांनाही सलग पाच वर्ष परवानगी देण्याचे निर्देश देत मुख्यमंत्री म्हणाले, मूर्तीकारांनी या परवान्यांचे दरवर्षी नूतनीकरण करावे. परवानगीसाठी महापालिकेमार्फत सुरू करण्यात आलेल्या संगणकीय प्रणालीवर आधारित एक खिडकी योजनेचा लाभ घेण्यात यावा. गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यासाठी कृत्रिम तलावांची संख्या व उंच मूर्तींचे खोल समुद्रात विसर्जनासाठी बोटींची संख्याही समुद्रकिनारी वाढविण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

### मागील वर्षी दिलेल्या सवलती यंदाही कायम

गणेशोत्सवाला राज्य शासनाने राज्य महोत्सवाचा दर्जा दिला आहे. त्यामुळे शासनातर्फे हा महोत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर विस्तृत नियोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सव मंडळांना मागील वर्षी दिलेल्या सर्व सवलती याही वर्षी कायम ठेवण्यात येतील. सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या कार्यालयांसाठी मालमत्ता कराची आकारणी करताना या कार्यालयांचा व्यावसायिक कारणासाठी उपयोग होत नसल्याबाबत मंडळांनी प्रशासनाला लेखी दिल्यास अशा मंडळांच्या कार्यालयांवर मालमत्ता कराची आकारणी करण्यात येणार नाही, असा निर्णयही या वेळी घेण्यात आला.

# खारघरमध्ये एकतेचा नारा

## देशाप्रति अभिमान व्यक्त करा -आमदार प्रशांत ठाकूर



(तिरंगा यात्रांची अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**खारघर : रामप्रहर वृत्त**

राष्ट्रीय एकता, अखंडता आणि अभिमान जपण्यासाठी खारघर येथे भाजप मंडळ, तिरंगा यात्रा सन्मान समिती आणि खारघर रेसिडेंट्स वेल्फेअर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने तिरंगा पदयात्रेचे आयोजन बुधवारी (दि. १३) करण्यात आले होते. या वेळी सर्वजण देशप्रेमाने भारावलेले दिसून आले.

तिरंगा पदयात्रेत आमदार प्रशांत ठाकूर यांनी नागरिकांसमवेत सहभागी होत देशभक्ती आणि देशाप्रति अभिमान व्यक्त करण्याचे आवाहन केले. (पान २ वर..)

# विचुंबे येथे देशप्रेमी एकवटले

## अनेकांनी भारताचा मान वाढवला -अविनाश कोळी



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारताच्या स्वातंत्र्यापासून सैनिक, खेळाडू आणि विविध क्षेत्रातील व्यक्तींनी देशाचा मान राखला आणि वाढवला आहे, असे प्रतिपादन भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी बुधवारी (दि. १३) विचुंबे येथे आयोजित तिरंगा पदयात्रेत केले.

भाजप पनवेल तालुका पूर्व मंडळाच्या वतीने स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेत भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत, माजी जि.प. सदस्य राजेंद्र पाटील, अमित जाधव तसेच धनराज विसपुते, एकनाथ देशेकर, (पान २ वर..)

# भारतीय नागरिक व्हायच्या आधीच सोनिया गांधींचे मतदारयादीत नाव

## राहुल गांधींच्या मतचोरीच्या आरोपांना भाजपचे प्रत्युत्तर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि काही राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये मतचोरी झाल्याचे म्हणत लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी निवडणूक आयोगावर गंभीर आरोप केले होते. राहुल यांनी भाजपलाही लक्ष्य केले होते. आता भाजपने काँग्रेसच्या माजी अध्यक्ष सोनिया गांधी यांचे नाव ४५ वर्षांपूर्वी भारतीय नागरिक होण्यापूर्वीच बेकायदेशीरपणे मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले होते, असे सांगत काँग्रेसवर हल्ला चढवला आहे.

या मुद्द्यावर भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी एक्सवर पोस्ट केली आहे, तर खासदार अनुराग ठाकूर यांनी पत्रकार परिषद घेत आरोपांना उत्तर दिले.

दिल्लीतील भाजप मुख्यालयात घेतलेल्या पत्रकार परिषदेत खासदार अनुराग ठाकूर यांनी म्हटले की, इंदिरा गांधी म्हणायच्या, मतदार मूर्खांचा समूह असतात. राजीव गांधी निवडणूक हरले तेव्हा त्यांनी मतपत्रिकेला दोष दिला. (पान २ वर..)

## निवडक

### मनी लॉण्डरिंग प्रकरणात अनिल पवार यांना अटक

**मुंबई** : महाराष्ट्रात सक्तवसुली संचालनालयाने (ईडी) मोठी कारवाई केली आहे. वसई-विरारचे माजी महापालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांना अटक झाली आहे. पवारांसह चार जणांना ईडीने ताब्यात घेतले आहे. मनी लॉण्डरिंग प्रकरणात पवारांना अटक झाली आहे.

### दहशतवादी तहव्वुर राणाच्या न्यायालयीन कोठडीत वाढ

**नवी दिल्ली :** येथील एनआयए विशेष पटियाला हाऊस न्यायालयाने २६/११ मुंबई हल्ल्यातील आरोपी दहशतवादी तहव्वुर राणा याची न्यायालयीन कोठडी ८ सप्टेंबरपर्यंत वाढवली आहे. त्याला दूरदृश्यप्रणालीद्वारे न्यायाधीशांसमोर हजर करण्यात आले होते. राणाला नवीन वकिलाची नियुक्ती करण्याबाबत त्याच्या भावासोबत चर्चा करण्यासाठी तीन फोन कॉल करण्याची परवानगी कोर्टाने दिली.

## अभिनंदन अन् शुभेच्छा!




**पनवेल : कोल्हापूर येथे नुकत्याच झालेल्या सीबीएसई ॲथलेटिक्स क्लस्टर स्पर्धेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमधील इयत्ता दहावीची विद्यार्थिनी सिया पाटील हिने १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत रौप्यपदक मिळवले. या कामगिरीमुळे तिची सीबीएसई नॅशनल मीट २०२५-२६साठी निवड झाली आहे. सिया व तिला मार्गदर्शन करणारे सूरज पाटील, रेश्मा पाटील यांचे संस्थेचे चेअरमन, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि शाळेच्या मुख्याध्यापिका राज अलोनी यांनी कौतुक करून अभिनंदन केले तसेच राष्ट्रीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.**

पाणीपुरवठ्यासंदर्भात गव्हाण ग्रामस्थांचा सिडको प्रशासनाविरुध्द
जन आक्रोश मोर्चा
गव्हाण गावातील सर्व नागरिकांना या पत्राद्वारे कळविण्यात येते की, गव्हाण गाव हे अनेक समस्यांनी ग्रासलेले आहे. नवी मुंबईचा विकास होत असताना उलवे नोडचा विकास होत आहे, पण गव्हाण गाव पनवेल तालुक्यात सर्वात मोठे गाव असतानाही या गावात अनेक समस्या आहेत. त्या एकत्र येवून सोडविण्याची आज गरज आहे. त्यातीलच आजच्या घडीला पाणी प्रश्न ही अतिशय महत्वाची समस्या झाली आहे. याच समस्येचे निराकरण करण्यासाठी सर्व गव्हाण ग्रामस्थांच्या एकजुटीने सिडको प्रशासनावर भव्य मोर्चा काढण्याचा ठराव केला आहे. तरी आपल्या गावातील प्रत्येक व्यक्तीने मोर्चात सहभागी होणे गरजेचे आहे.
गुरुवार दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता
ठिकाण
सेक्टर - १९, सिडको ऑफीस, उलवे नोड.
आपले नम्र
तीन समाज अध्यक्ष व ग्रामस्थ मंडळ गव्हाण
मोर्चासाठी प्रत्येक घरातील व्यक्तीने हजर असणे गरजेचे आहे.
टिप : जाण्या-येण्याकरीता वाहनाची व्यवस्था केली आहे.

# मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात सीकेटी कॉलेज अव्वल

**कर्जत : प्रतिनिधी**

मुंबई विद्यापीठाच्या उत्तर रायगड विभागीय युवा महोत्सवात जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या पनवेलमधील खांदा कॉलनी येथील सीकेटी महाविद्यालयाने विविध स्पर्धांमध्ये पारितोषिके पटकवून अव्वल स्थान प्राप्त केले. या महोत्सवात जिल्ह्यातील २७ महाविद्यालयांमधील सुमारे साडेबाराशे विद्यार्थ्यांनी सहभाग होता.

मुंबई विद्यापीठाच्या ५८व्या युवा महोत्सवाचे आयोजन कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालय येथे उरण कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते. महोत्सवात एकूण ३२ इव्हेंट झाले. त्यात सर्वाधिक स्पर्धा जिंकत सीकेटी कॉलेजने बाजी मारली.



पारितोषिक वितरण समारंभास मुंबई विद्यापीठ सांस्कृतिक समन्वयक डॉ. निलेश सावे, संस्थेचे सदस्य झुलकरनैन डाभिया, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, डॉ. वाल्मिक गर्जे, डॉ. पराग कारुळकर, डॉ. दीपक गायकवाड, डॉ. निलोफर खान आदी उपस्थित होते.

## कबुतरखान्यावरील बंदी तूर्त कायम

**मुंबई** : दादरसह मुंबईतील कबुतरखान्यांच्या मुद्द्यावर बुधवारी (दि. १४) उच्च न्यायालयात सुनावणी झाली. हायकोर्टाने पुढील चार आठवड्यांसाठी सर्वोच्च न्यायालयाचा कबुतरखाने बंद ठेवण्याचा आदेश कायम ठेवला आहे तसेच तज्ज्ञांची समिती तयार करून निर्णय घेण्यास सांगितले आहे.

या सुनावणीनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकांचे आरोग्य अत्यंत महत्त्वाचे आहे. त्याबरोबरच काही आस्थेचे विषय आहेत. समाजाचे आरोग्य आणि आस्था दोन्ही गोष्टी विचारात घेऊन योग्य प्रकारे समतोल साधून मार्ग काढण्याचा प्रयत्न करू.

# दहीहंडीसंदर्भात बैठक

## पनवेल शहर पोलिसांकडून मंडळ पदाधिकाऱ्यांना सूचना

**पनवेल : वार्ताहर**

आगामी दहीहंडी उत्सव निमीत्ताने पनवेल शहर पोलीस ठाणे येथे पोलीस ठाणे हद्दीतील आस्थाना व सार्वजनिक मंडळाचे प्रमुख पदाधिकारी यांची सहाय्यक पोलीस आयुक्त, पनवेल विभाग भाऊसाहेब ढोले यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली.

या बैठकीला वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांच्यासह विविध मंडळांचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी मार्गदर्शन करताना सहाय्यक पोलीस आयुक्त भाऊसाहेब



ढोले यांनी सांगितले की, कार्यक्रम ठिकाणी सीसीटीव्ही लावणे व स्वयंसेवक यांची नेमणूक करावी, संबंधीत सर्व आस्थापनाची परवानगी विहीत वेळेत प्राप्त करणे, दहिहंडी उत्सवादरम्यान वाहतुकीस अडथळा निर्माण होणार नाही तसेच इतर नागरीकांना त्रास होणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घेणे, दहिहंडी ठिकाणी गोविंदाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य त्या उपाययोजना करणे, दहिहंडी ठिकाणी प्रथमोउपचार पेटी, डॉक्टरांची टीम, ॲम्बुलन्स इत्यादी सोय करणे, कार्यक्रमा वेळी कोणत्याही जाती-धर्माच्या धार्मीक भावना दुखावल्या जातील असे आक्षेपार्ह गाणे, पोवडा, वाद्य, संगीत लावू नये तसेच आक्षेपार्ह भाष्य करू नये, ध्वनी प्रदुशण संदर्भात मा.न्यायालय यांनी दिलेल्या सुचनांचे उल्लंघन होणार नाही याबाबत योग्य ती खबरदारी घेण्यात यावी, सार्वजनिक दहीहंडी मंडळांनी दहीहंडी उत्सव ठिकाणे पार्किंगची व्यवस्था करावी, १४ वर्षाखालील गोविंदा नसावा, दहीहंडी उत्सव निमित्त भेट देणाऱ्या सलामी पथकाची नोंद रजिस्ट्री ठेवावे अश्या सूचना देण्यात आल्या.

## कोपरखैरणेत मुलीची आत्महत्या

**नवी मुंबई : बातमीदार**

घरची बेताची आर्थिक परिस्थिती व बेरोजगारीला कंटाळून माथाडी कामगाराच्या मुलीने आत्महत्या केल्याची घटना कोपरखैरणेत घडली आहे. रविवारी खोलीत एकटी असताना तिने गळफास घेतला. काही वेळातच घरातील व्यक्तींना हा प्रकार लक्षात आल्यानंतर त्यांनी पोलिसांना कळवून तिला रुग्णालयात दाखल केले असता डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

अश्विनी मोरे (वय २६) असे आत्महत्या केलेल्या तरुणीचे नाव असून ती माथाडी कामगार राजू मोरे यांची मुलगी आहे. कोपरखैरणे सेक्टर ५ येथे राहण्यास असून अश्विनी पदवीपर्यंतचे शिक्षण झाले आहे. कुटुंबाला हातभार लावण्यासाठी ती सहा महिन्यांपासून नोकरीच्या शोधात होती, परंतु नोकरी मिळत नसल्याने चिंतेत होती. रविवारी सर्व घरात असताना ती खोलीत एकटी होती. ती झोपली असावी, असे कुटुंबीयांना वाटले, मात्र संध्याकाळपर्यंत ती खोलीतून बाहेर न आल्याने कुटुंबीयांनी दरवाजा उघडला असता गळफास घेतलेल्या अवस्थेत ती आढळली.

# पेणमध्ये भाजपतर्फे तिरंगा रॅली

## शालेय विद्यार्थ्यांच्या वेशभूषने वेधले नागरिकांचे लक्ष

**पेण : प्रतिनिधी**



१५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त पेण तालुका व शहर भारतीय जनता पक्षाच्या वतीने पेणमध्ये तिरंगा रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीचा शुभारंभ पेण महात्मा गांधी वाचनालय येथून करण्यात आला. ही रॅली डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक, छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे महावीर मार्ग, कवंडाळ तळे, नरदास चाळ मार्गे नेऊन पेण नगरपरिषद समोर या रॅलीचे विसर्जन करण्यात आले.

या वेळी रॅलीमध्ये माजी नगराध्यक्ष प्रितम पाटील, माजी जि.प.अध्यक्ष निलिमाताई पाटील, माजी जि.प. सदस्य डी. बी. पाटील, भाजप शहर अध्यक्ष रविंद्र म्हात्रे, युवा मोर्चा अध्यक्ष स्वप्नील म्हात्रे, माजी नगरसेवक अजय क्षिरसागर, माजी सभापती प्रकाश रामाणे, बाजार समिती सदस्य संदेश ठाकूर, प्रफुल्ल म्हात्रे, परशुराम पाटील, पुजा पाटील, प्रभाकर म्हात्रे, प्रचिता पाटील, विवेक पाटील, मुरलीधर भोईर, कमलाकर मोकल, हितेश पाटील, साकिब मुजावर आदींसह पेण नगरपरिषद शाळेतील विद्यार्थी सहभागी झाले होते. या वेळी रॅलीत महात्मा गांधी, भारतमाता, नेताजी सुभाषचंद्र बोस, राणी लक्ष्मीबाईची वेषभुषा परिधान केलेले विद्यार्थी नागरिकांचे लक्ष वेधत होते.

## पनवेलमध्ये आज सांस्कृतिक कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेतर्फे आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घरो घरी तिरंगा -हर घर तिरंगा मोहीम राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत तिरंगा सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. यात भव्य देशभक्तीपर गीत व नृत्याचा सांस्कृतिक कार्यक्रम गुरुवार, १४ ऑगस्ट २०२५ रोजी दुपारी ३ वाजता आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृह, पनवेल येथे होणार आहे.

याबरोबरच तिरंगा सेल्फी पॉइंट, तिरंगा ध्वजाबद्दल माहिती असलेले प्रदर्शनाचे उद्घाटन तसेच स्वातंत्र्य सैनिक, वीर माता, राष्ट्रीय खेळाडू यांचा यानिमित्त सन्मान करण्यात येणार आहे. 'देवकी मीडिया' प्रस्तुत आणि कलारंजना मुंबई निर्मित भारत गौरवगाथा - देश प्रेमाच्या स्वरलहरी...! हा देशभक्तीपर गीत-नृत्याचा कार्यक्रम सादर होणार आहे.कार्यक्रमाची संकल्पना आणि संगीत संयोजन साहिल रेळेकर यांचे असून, निर्मिती आणि दिग्दर्शन उदय साटम यांनी केले आहे. नेत्रदीपक सेट आणि प्रकाशयोजनेच्या माध्यमातून या कार्यक्रमाचे सौंदर्य आणखी खुलणार आहे.

पनवेल महानगरपालिकेतर्फे सर्व नागरिकांना या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. प्रवेश विनामूल्य असून, हा कार्यक्रम सर्वांसाठी खुला आहे.

## बेस्ट कामगारांच्या निवडणुकीत भाजपप्रणित पॅनल मैदानात!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दि बेस्ट एम्प्लॉईज को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या पंचवार्षिक निवडणुकीत यंदा राजकारण रंगणार आहे. आधीच उबाठा व मनसे यांनी एकत्रित एक पॅनल तयार केलेला आहे. भाजप प्रणित बेस्ट कामगार संघ हा स्वबळावर लढत आहे.

भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या आदेशानुसार भाजप प्रणित बेस्ट कामगार संघाने या निवडणुकीमध्ये कंबर कसली आहे. युनियनचे अध्यक्ष गणेश हाके साहेब बेस्ट समितीचे माजी सदस्य व बेस्ट कामगारांचे भीष्माचार्य सुनील गणाचार्य व सरचिटणीस गजानन नागे यांच्या मार्गदर्शनाखाली कट्टर भाजप समर्थक उमेदवार या पॅनलमध्ये उमेदवार आहेत. त्यामुळे सुज्ञ मतदारांनी भाजप बेस्ट कामगार संघाला सहकार्य करून जास्तीत जास्त उमेदवार निवडून आणावेत, असे आवाहन करण्यात आलेले आहे.

सहकार विकास पॅनलचे सर्वसाधारण गटाचे उमेदवार सुदाम ताराचंद चव्हाण, संतोष शंकर दळवी, लालू नागनाथ दर्वे, आबासो शिवाजी देटके, श्रीकांत शंकर गलांडे, आनंदा जयसिंग जरग, शैलेंद्र देविदास मगरे, फिरोज बापूसाहेब मुल्ला, योगेश दत्तू सांगळे, नवनाथ वसंत सावंत, संतोष सुदाम शेगर, विलास दत्तू शेळके, सुनील भगवान वाडकर अनुसूचित जाती जमाती मधून वाल्मीक सुखदेव क्षेत्रे इतर मागासवर्गीय उमेदवार रवींद्र बाबुराव वैद्य व भटक्या विमुक्त जाती मधून बबन दादाबा बारगजे हे उमेदवार आहेत.

बेस्ट कामगारांच्या विकासासाठी व बेस्ट कामगारांचे भले करण्यासाठी भ्रष्टाचार मुक्त कारभार करण्यासाठी आपण या पॅनलच्या उमेदवारांना उगवता सूर्य या निशाणीवर शिक्का मारून प्रचंड मताधिकाने विजयी करावे, असे आवाहन प्रचार प्रमुख अनिल यादव यांनी केले आहे.

## मुंबईत उद्या 'पॉझ इन द पार्क'

**मुंबई :** कुत्र्यांच्या चाव्याच्या घटनांमध्ये वाढ होत असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. १८ वर्षांपासून प्राणीसेवेत कार्यरत ॲनिमल संस्थेने सकारात्मक व मानवी उपाय सुचवला आहे. प्रशिक्षण, लसीकरण आणि जनजागृतीवर आधारित 'पॉझ इन द पार्क' हा विशेष कार्यक्रम १५ ऑगस्ट रोजी व्हिक्टोरिया साउथ, भायखळा येथे होणार आहे.

या उपक्रमात मोफत रेबीज लसीकरण, भटक्या श्वानांचा दत्तक मेळावा, चावा घेतल्यावर घ्यावयाची पावलं व कायदेशीर माहिती देण्यात येणार आहे. रेबीज हा प्राणघातक, परंतु पूर्णतः टाळता येणारा रोग आहे. कार्यक्रमात पेट फॅशन शो, ट्रेनिंग, ग्रूमिंग व संवादाचे प्लॅटफॉर्महीही असतील.

## पनवेलमधील शाळा-महाविद्यालयांत पत्रलेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, प्रतिज्ञा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेमार्फत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'घरोघरी तिरंगा- हर घर तिरंगा' मोहिम १५ ऑगस्टपर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबविली जात आहे. या मोहिमेंतर्गत नुकतेच महापालिका कार्यक्षेत्रातील विविध शाळा महाविद्यालयांमध्ये पत्रलेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा, प्रतिज्ञा घेण्यात आली.

देशवासियांच्या ह्रदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्र ध्वजाबद्दल जागरूकता वाढविण्याच्यादृष्टीने ' घरोघरी तिरंगा' ही लोकचळवळ राबविण्यात येणार आहे. या मोहीम अंतर्गत पनवेल महानगरपालिके मार्फत लोकनेते रामशेठ ठाकूर शाळा कामोठे, डीएसपी इंटरनॅशनल स्कूल कामोठे ,एमएनआर स्कूल ऑफ एक्सलन्स कामोठे, शांतिनिकेतन स्कूल पनवेल, गोखले एज्युकेशन सोसायटी खारघर, रॅडक्लिफ स्कूल खारघर, श्री सुविद्या शाळा कामोठे, रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल खारघर, रामशेठ ठाकूर कनिष्ठ महाविद्यालय खारघर, पिल्लई कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पनवेल अशा विविध शाळा व महाविद्यालयांमध्ये पत्र लेखन स्पर्धा, प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. तसेच या स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना प्रमाणपत्र देण्यात आले. याबरोबरच प्रतिज्ञा घेण्यात आली.



# गव्हाण विद्यालयात अहिल्यादेवी होळकरांना अभिवादन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

कुशल प्रशासक राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या २३० व्या पुण्यतिथीनिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विनम्र अभिवादन करण्यात आले.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत यांच्या शुभहस्ते राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजयशेठ घरत, युवा नेते मयूर कदम, गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्या रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या जोत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे,पर्यवेक्षिका शशिकला पाटील, संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे,ग्रंथपाल महेश म्हात्रे, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, अविनाश कजबजे,राहुल म्हात्रे, संतोष पवार व इतर सेवक आणि विद्यार्थी उपस्थित होते.


# खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात सामंजस्य करार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.१३) मॅनेजमेंट स्टडीज विभाग व आरसीआयआयएफ खारघर या दोन्ही संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या सामंजस्य करारासाठी मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रा.शिवानी मानकामे व प्रा. शितल चव्हाण यांनी आरसीआयआयएफ खारघर येथे उपस्थिती दर्शवली. या वेळी आरसीआयआयएफचे संचालक दिनेश इसराणी यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून दोन्ही संस्थांमधे ज्ञान-संसाधनाची देवाण-घेवाण होईल, अशी हमी दिली. या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाविद्यालयातील मॅनेजमेंट स्टडीज विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळे सामाजिक, शैक्षणिक व पर्यावरणीय उपक्रम तसेच वेगवेगळ्या विषयांचे कोर्सेस सुरू करण्यात येतील तसेच प्रशिक्षण देण्यात येईल.

हा करार महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे व मॅनेजमेंट स्टडीज विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. रीत ठुले यांच्या मार्गदर्शनात व त्यांच्या सहमतीने करण्यात आला तसेच मॅनेजमेंट स्टडीज विभागातील प्रा. आकांक्षा त्रिपाठी, प्रा. अर्पिता नायक, प्रा. रेहणुमा खान व प्रा. स्नेहा नाईक आदींचे या उपक्रमासाठी सहकार्य लाभले.



पान १ वरून

### भारत माता की जय!

या वेळी मान्यवरांनी आपल्या भाषणातून स्वातंत्र्य दिनाचे महत्त्व अधोरेखित करत देशभक्ती व एकात्मतेचा संदेश दिला तसेच नागरिकांना तिरंग्याचा सन्मान राखण्याचे आणि राष्ट्रहितासाठी एकजूट राहण्याचे आवाहन केले. भाजपच्या या तिरंगा यात्रेने पनवेलकर नागरिकांमध्ये देशप्रेम आणि अखंडतेची भावना अधिक दृढ केली.

### खारघरमध्ये एकतेचा नारा

या पदयात्रेला खारघर सेक्टर १९ येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल येथून सुरुवात झाली. नागरिक मोठ्या संख्येने पदयात्रेत सहभागी झाले होते. त्यांनी वंदे मातरम्, भारतमाता की जय अशा घोषणा देत परिसर दणाणून सोडला.

पदयात्रेत भाजपचे जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, निलेश बाविस्कर, नरेश ठाकूर, गुरूनाथ गायकर, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, नेत्रा पाटील, आरती नवघरे, महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस संध्या शारबिद्रे, मंडळ सरचिटणीस दीपक शिंदे, उपाध्याक्ष किरण पाटील, अमर उपाध्याय, समीर कदम, वासुदेव पाटील, किर्ती नवघरे, संजय घरत, अजित अडसुळे, चिटणीस दत्ता ठाकूर, अनिता जाधव, महिला मोर्चा अध्यक्ष साधना पवार, युवा मोर्चा अध्यक्ष नितेश पाटील, स्नेहल बोधाई, जुमा चक्रबर्ती, रजनी शर्मा, संतोष शर्मा, अजय माळी, राजेंद्र माजरेकर, फुलाजी ठाकूर, भरत कोंढाळकर, कांचनकुमार बिर्ला, स्मिता आचार्य, शोभा मिश्रा, दुर्गा बन्सल, सीमा खडसे, दुर्गा अंजुरे, प्रवीण बेरा, शुभ पाटील, अक्षय लोखंडे, आदित्य हातगे, शनी नवघरे, रवींद्र पाटील, माजी सैनिक चंद्रभान, शिवप्रसाद थपलियाल, परमिंदर सांगवान यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. केंद्रीय विहार मेट्रो स्टेशनजवळ पदयात्रेची सांगता झाली.

### विचुंबे येथे देशप्रेमी एकवटले

पळस्पे विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, पनवेल तालुका पूर्व मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील, सरपंच प्रमोद भिंगारकर, उपसरपंच साधना वाघमारे, आनंद ढवळे, बळीराम पाटील, कमला देशेकर, संदीप वाघमारे, गुरूनाथ म्हात्रे, यतीन पाटील, युवा मोर्चाचे तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, श्रावणी भोईर, अनंता गायकवाड, चेतन भिंगारकर, प्रगती गोंधळी, किशोर सुरते, अविनाश गायकवाड, अनिल भोईर, आनंद गोधळी, चेतन सुरते, धनंजय भोईर, महेश भिंगारकर, स्वाती पाटील, निलेश वाघमारे यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. पदयात्रेदरम्यान देशभक्तीपर घोषणांनी परिसर दुमदुमून गेला होता.

विचुंबे येथील डी.डी. विसपुते कॉलेजपासून सुरू झालेली ही पदयात्रा ग्रीन व्हॅली बिल्डिंग, शिवम सोसायटी, ग्रामपंचायत कार्यालय, विचुंबे गाव, वरची आळी आणि मरीआई मंदिरापर्यंत मार्गक्रमण करून देवद येथील विठ्ठल रखुमाई मंदिराच्या परिसरात सांगता झाली.

या वेळी बोलताना भाजप जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी म्हणाले की, देशाच्या स्वातंत्र्यापासून सैनिकांनी सीमेवर लढून देशाचे रक्षण केले आहे. खेळाडूंनी आंतरराष्ट्रीय स्तरावर देशाचा मान वाढवला आहे, तर विविध क्षेत्रांतील व्यक्ती आणि नागरिकांनीही देशाच्या प्रगतीत योगदान दिले आहे. येत्या स्वातंत्र्य दिनी घरोघरी तिरंगा फडकवून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्याचे आवाहनही त्यांनी केले.

### भारतीय नागरिक व्हायच्या आधीच सोनिया गांधींचे मतदारयादीत नाव

ते म्हणायचे, निवडणुका ईव्हीएमवर घ्याव्यात आणि आता राहुल गांधी म्हणतात, निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात. हे लोक दुसऱ्यांवर आरोप करत राहतात, म्हणून आता कुटुंबानेच ठरवावे की कोणाला काय हवे आहे.

भाजप आयटी सेलचे प्रमुख अमित मालवीय यांनी एक्सवरील पोस्टमध्ये आरोप केला आहे की, सोनिया गांधी यांचे नाव १९८० आणि १९८३मध्ये दोनदा मतदार यादीत समाविष्ट करण्यात आले होते. या दोन्ही वेळा त्यांच्याकडे भारताचे नागरिकत्व नव्हते. हे संपूर्ण प्रकरण निवडणूक कायद्याचे स्पष्ट उल्लंघनाचे उदाहरण आहे.

## राज्यातील शाळांत पसायदान पठणाचे निर्देश

**मुंबई :** संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींच्या ७५० व्या जयंतीनिमित्त राज्यात सर्व शाळांमध्ये १४ ऑगस्ट रोजी पसायदानाचे सामूहिक पठण करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले आहेत.

सन २०२५ वर्ष हे संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ७५०व्या जयंतीचे वर्ष आहे. यानिमित्ताने माऊलींचा पसायदानाच्या माध्यमातून दिलेला विचार राज्यातील प्रत्येक शाळांमध्ये एकाच वेळी पोहचावा असा शासनाचा उद्देश आहे. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी पुणे येथील शिक्षण विभागाचे आयुक्त यांना यासंदर्भात कळविले आहे. शिक्षण आयुक्त कार्यालयाकडून हे आदेश राज्यातील सर्व अनुदानित, विना अनुदानित, खासगी, महापालिका, जिल्हा परिषद, संस्थात्मक शाळांना कळविण्यात आले आहेत.

## नागाव येथील वॉकेथॉनमध्ये स्वच्छतेबाबत जनजागृती

**पाली : प्रतिनिधी**

रायगडच्या अलिबाग तालुक्यातील ग्रुप ग्रामपंचायत नागाव पर्यटन संस्था व रोटरी क्लब ऑफ अलिबाग सी शोअर यांच्या संयुक्त विद्यमाने बुधवारी (दि.१३) नागाव वॉकेथॉनचे आयोजन करण्यात आले होते. जगाच्या नकाशावर पर्यटनात्मक दृष्या अत्यंत नावलौकिक मिळवलेल्या नागावला अधिक सुंदर व स्वच्छ ठेवण्याच्या उद्देशाने आज नागावकर स्वयंस्फूर्तीने एकवटले.

स्वच्छ नागाव चा नारा देत कचरा व्यवस्थापनाचे महत्व पटवून दिले. तसेच सदृढ व निरोगी आरोग्यासाठी चालणे किती महत्वाचे आहे हेदेखील या वेळी सांगण्यात आले. झिरो वेस्ट मॅनेजमेंट संकल्पना साकार करण्यासाठी ओला व सुका कचरा विलगीकरण करून इतरत्र कुठेही न टाकता घंटा गाडीचा वापर करण्याबाबत नागरिकांना आवाहन करण्यात आले. या रॅलीत सहभागी झालेल्या विद्यार्थी नागरिक यांना छत्री व सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

स्वच्छतेचा संदेश देण्यासाठी नागावकर यांनी नागाव हायस्कुल ते नागाव हटाळे बाजार या मार्गे रॅली काढत स्वच्छ नागावसाठी नागरिकांनी पुढाकार घेतला. वॉकेथॉनमध्ये असंख्य विद्यार्थी व ग्रामस्थांनी सहभाग घेतला.



# शाळा-महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम

## कामोठ्याच्या लोकनेते रामशेठ ठाकूर स्कूलमध्ये आंतरराष्ट्रीय परिषद

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलमध्ये गुणवत्तापूर्ण शिक्षणावरील आंतरराष्ट्रीय परिषद बुधवारी (दि.१३) झाली. कार्यक्रमाची सुरुवात रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक कर्मवीर भाऊराव पाटील व रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमापूजन व दिपप्रज्वलन शाळेचे चेअरमन तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले.



यानंतर सर्व उपस्थित परदेशी मान्यवरांचे स्वागत शाळेचे चेअरमन प्रशांत ठाकूर शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी सर यांनी केले. STEAM शिक्षणाद्वारे शिक्षणाची गुणवत्ता वाढवून मुलांमध्ये २१ व्या शतकातील कौशल्ये आणि आध्यात्मिक कल्याणाचे संस्कार करणे हे या परिषदेचे प्रमुख उद्दिष्ट होते. परिषदेमध्ये श्रीलंका वरून आलेले शिक्षक, विविध शाळांमधील मुख्याध्यापक, शिक्षकवृंदांनी अत्यंत उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवला होता.

परिषदेला सुरुवात करण्याअगोदर शाळेचे प्राचार्य अविनाश कुलकर्णी त्यांनी शाळेचा अहवाल सर्व उपस्थितांसमोर सादर केला. शाळेतील शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी भारतीय संस्कृतीचे दर्शन अर्थातच गणेशस्तवन, मंगलागौरी व स्वातंत्र्याचे गुणगान नूत्याद्वारे सादर केले. त्यानंतर उपस्थित मान्यवरांनी इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधला. त्यांना श्रीलंका देशाची शिक्षण पद्धती समजावून सांगितली. तसेच प्रत्यक्ष वर्गात जाऊन विद्यार्थ्यांची गुणवत्ता व शिक्षण कार्यपद्धती पाहिली. ह्यावेळी श्रीलंका वरून आलेले शिक्षकांचे व लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचे शिक्षिका भाग्यश्री मॅडम, अंकिता मॅडम, सी.के.टी विद्यालयाचे प्राचार्य चव्हाण सर, सौ शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांचे सादरीकरण हे झाले.

या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून शाळेचे चेअरमन तथा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, पाहुणे निहाल गुणारत्ने (सचिव, शिक्षण मंत्रालय श्रीलंक), जनक कमलगोडा (अध्यक्ष, इंटरनॅशनल असोसिएशन फॉर क्वालिटी एज्युकेशन,श्रीलंका), डॉ. रश्मी त्यागी (उपाध्यक्ष, पीस अँड वेलफेयर फाउंडेशन), निलांथा एकनायका (माजी व्यवस्थापकीय संचालक, श्रीलंका), वत्सला प्रसंगानी (संचालक, साउथ एशियन इंटरनॅशनल असोसिएशन फॉर अर्ली चाइल्डहुड केअर अँड डेव्हलपमेंट), वाय. टी. देशमुख (जनरल बॉडी सदस्य, रयत शिक्षण संस्था सातारा), मोहन कोंगेरे (विभागीय अधिकारी रयत शिक्षण संस्था रायगड विभाग), स्वप्नाली म्हात्रे (प्राचार्या लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम व जुनियर कॉलेज कामोठे) विविध शाळेतील मुख्याध्यापक व शिक्षक उपस्थित होते. या परिषदेचा मुख्याध्यापक, शिक्षक व विद्यार्थी यांना आपल्या जीवनामध्ये नक्कीच फायदा होईल. शाळेच्या पर्यवेक्षिका लुबना मॅडम यांनी सर्वांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

## युवा महोत्सवात बीसीटी लॉ कॉलेजची कामगिरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड विभागीय फेरीत कोकण ज्ञानपीठ, राहुल धारकर फार्मसी कॉलेज ऑफ फार्मसी, कर्जत येथे कला, संस्कृती आणि प्रतिभेचा उत्साही उत्सव साजरा करण्यात आला. रविवारी (दि.१०) सकाळी ८ वाजल्यापासून आयोजित या कार्यक्रमात विविध सांस्कृतिक श्रेणींमध्ये स्पर्धा करणाऱ्या २४ महाविद्यालयांना एकत्र आणण्यात आले.

भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) कायदा महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. सान्वी देशमुख आणि बी.ए.एल.एल.बी. समन्वयक सहाय्यक प्रा. धनश्री कदम यांच्या मार्गदर्शनाखाली २२ विद्यार्थ्यांचा उत्साही पथक पाठवला, ज्यात सहाय्यक प्रा. ऐश्वर्या पाटोळे, सहाय्यक प्रा. सुरज भालेराव आणि सहाय्यक प्रा. शिल्पा नागावकर यांचा समावेश होता.

या संघाने साहित्य कला, ललित कला, नाट्य, संगीत आणि नृत्य अशा २३ स्पर्धांमध्ये भाग घेतला. अनेक विद्यार्थ्यांनी अनेक श्रेणींमध्ये भाग घेऊन अपवादात्मक समर्पण दाखवले, अनेकदा दोन किंवा तीन स्पर्धांमध्ये भाग घेतला. विद्यार्थी सांस्कृतिक प्रतिनिधी वेदांत मोहिते (तृतीय वर्ष बी.ए.एल. एल.बी) आणि गायत्री गोखले (तृतीय वर्ष एल.एल.बी) यांच्या काळजीपूर्वक व्यवस्थापनामुळे संपूर्ण कार्यक्रम यशस्वी झाला.



### महाविद्यालयाने मिळवले पाच पुरस्कार

*स्किट गट क - पहिला पुरस्कार, कथाकथन (मराठी) - श्रावणी करांडे (तृतीय वर्ष बी.ए.एल.एल.बी) - पहिला पुरस्कार, मोनो ॲक्टिंग गट क - अपूर्वा जोगले (तृतीय वर्ष बी.ए.एल.एल.बी) - दुसरा पुरस्कार, वक्तृत्व गट ब - दिप्ती गायकवाड (दुसरे वर्ष बी.ए.एल.एल.बी) - तिसरे पुरस्कार, भारतीय लोकनृत्य - सांत्वन पुरस्कार*

## स्वातंत्र्य दिनानिमित्त सीकेटी विद्यालयात विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) मराठी पूर्वप्राथमिक व प्राथमिक विद्यालयात भारताच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध कार्यक्रम उत्साहात पार पडले.

या कार्यक्रमात मराठी पूर्व प्राथमिक विभागातर्फे बालवाडी विभागाच्या वेशभूषा स्पर्धा घेण्यात आल्या. तसेच पारितोषिक वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. मराठी प्राथमिक विभागातर्फे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृतमहोत्सवीवर्षा निमित्त वेशभूषा स्पर्धा व कै.चांगू काना ठाकूर साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त रंगभरण व चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या होत्या. त्या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमादरम्यान विद्यार्थ्यांनी विविध देशभक्तीपर नृत्य, समूहगीत सादर केले व कार्यक्रमात रंगत आणली.

या स्वातंत्र्यदिनानिमित्त कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या सुकापूर ग्रामपंचायतीच्या सदस्य पुनम प्रमोद भगत या उपस्थित होत्या. तसेच इंग्रजी पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी मॅडम तसेच पूर्वप्राथमिक व प्राथमिक विभागाचे पालक प्रतिनिधी इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यालयाचे सहाय्यक शिक्षक पंढरीनाथ जाधव यांनी मान्यवरांचे शब्द सुमनाने आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.



## सुषमा पाटील विद्यालयात आज शाळा अंतर्गत फेरी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आमदार प्रशांत ठाकूर चषक २०२५ वक्तृत्व स्पर्धेच्या शाळा अंतर्गत फेरीसाठी सुषमा पाटील विद्यालय कामोठे येथील विद्यार्थी उत्साहात तयारी करत आहेत. त्या अनुषंगाने गुरुवार,१४ ऑगस्ट होणाऱ्या या फेरीत इयत्ता पहिली ते आठवी पर्यंतचे एकूण २१५ विद्यार्थी या स्पर्धेत वक्तृत्व कौशल्य सादर करणार आहेत. या फेरीतून एकूण २४ विद्यार्थी आंतरशालेय फेरीसाठी पात्र ठरणार आहेत.

विद्यार्थ्यांनी माझं स्वप्न, शिक्षणाचं महत्त्व, इंटरनेट - वरदान की शाप?, प्लास्टिक मुक्त भारत अशा विविध विषयांवर आपले विचार मांडणार आहेत. विषयाची मांडणी व सुसंगता, देहबोली, स्वच्छ आणि स्पष्ट आवाज, वक्तशीरपणा, भाव आणि आवाजातील चढ-उतार हे गन या स्पर्धेत महत्वाचे ठरणार आहे. अशा स्पर्धा विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवतात, संवादकौशल्य विकसित करतात आणि त्यांच्यात नेतृत्व गुण रुजवतात. कोशिश फाउंडेशनच्या पुढाकारातून आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनातून हा उपक्रम यशस्वीपणे राबवला जात आहे. त्यानुसार गुरुवारी कामोठे येथील सुषमा पाटील विद्यालयात शाळा अंतर्गत फेरीसाठी विद्यार्थी सज्ज झाले आहेत.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅम



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवारी (दि.१३) अकाउंट व फायनान्स विभागातर्फे फॅकल्टी एक्स्चेज प्रोग्रॅमचे आयोजन केले होते.

या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रामसाठी वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड बिज़नेस मैनेजमेंट, सानपाडा, नवी मुंबई महाविद्यालयातील प्रा. हिना सतकूट यांनी उपस्थित राहून अकाउंट व फायनान्स विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थी व विद्यार्थ्यांनीना फायनान्शियल अकाउंट विषयातील बारकावे, वेगवेगळ्या संकल्पना याविषयी मार्गदर्शन केले तसेच या व्याख्यानाचा लाभ सुमारे ५० विद्यार्थी व विद्यार्थिनीनी घेतला. अकाउंट व फायनान्स विभागातील प्रा. आनंद शेलार यांनी वेस्टर्न कॉलेज ऑफ कॉमर्स अँड बिज़नेस मैनेजमेंट, सानपाडा, नवी मुंबई महाविद्यालयात उपस्थित राहून तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना फायनान्शियल अकाउंट याविषयी मार्गदर्शन केले व त्यांच्या शंकांचे निरसन केले तसेच त्यांच्या व्याख्यानाचा लाभ सुमारे ५५ विद्यार्थी व विद्यार्थिनीनी घेतला.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला. या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रॅमचे आयोजन प्रा. डॉ. प्रवर शर्मा विभाग प्रमुख अकाउंट्स व फायनान्स विभाग यांनी केले तसेच प्रा. श्वेतांबरी बोठे, प्रा. योगिता पाटील, प्रा. करिष्मा कडव व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## 'हर घर तिरंगा' अंतर्गत कोपर शाळेत झेंडावंदन

### * विद्यार्थ्यांना गणवेश वाटप



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारकोपर येथील रा.जि.प. शाळा. कोपर (गव्हाण) येथे स्वातंत्र्याचा अमृतमहोत्सव व हर घर तिरंगा कार्यक्रमांतर्गत माजी उपसरपंच विजय घरत यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले तसेच या वेळी गव्हाण ग्रामपंचायतीमार्फत सर्व विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप करण्यात आले.

या वेळी शाळेचे चेअरमन अनंतशेठ ठाकूर, माजी सरपंच माई भोईर, वामनशेठ म्हात्रे, भाऊ भोईर, किशोर पाटील, ॲड. रुपेश म्हात्रे, नंदा भोईर व शाळेच्या मुख्याध्यापिका कल्पना म्हात्रे आदी उपस्थित होते.

## सीकेटी विद्यालयात 'हर घर तिरंगा'

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेलमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) विद्यालयाच्या इंग्लिश मीडियम पूर्व-प्राथमिक विभागातर्फे देशाच्या स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून बुधवारी (दि.१३) विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. संगीत शिक्षक रुपेश मढवी व संतोष खरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी सुरेख गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.



दरम्यान, उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाळांतर्गत घेण्यात येणाऱ्या विविध स्पर्धा, तसेच तालुका, जिल्हा, राष्ट्रीय स्तरातील कला व क्रीडा विभागात यश मिळविणार्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र, मेडल देऊन गौरविण्यात आले.

आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी अनेक वीर जवानांनी आपल्या प्राणांची आहुती देऊन मिळविलेले स्वातंत्र खूप मौल्यवान आहे तसेच स्वातंत्र्यदिन हा केवळ एक उत्सव नसून, भारतीय स्वातंत्र्यसैनिकांच्या त्याग, संघर्ष आणि दृढनिश्चयाचे प्रतीक आहे. यामुळे आपला स्वातंत्रलढा सर्वांसाठी प्रेरणादायी आहे, असे प्रतिपादन अर्चना ठाकूर यांनी केले. तसेच ब्रिटिश राजवटीच्या अत्याचारातून देशातील जनतेला मुक्त करण्यासाठी शेकडो स्वातंत्र्यसैनिकांनी आपले प्राण अर्पण केले. त्यामुळे हा दिवस त्या महान क्रांतिकारकांच्या आणि स्वातंत्र्यसैनिकांच्या बलिदानाला स्मरण करण्याचा दिवस, असे मुख्याध्यापिका निलिमा शिंदे यांनी महत्त्वपूर्वक मार्गदर्शन केले.

विद्यार्थ्यांनी सुरेल स्वरात देशभक्तीपर गीतांचे गायन केले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून जेबीएसपी संस्थेच्या कार्यकारी मंडळ सदस्या अर्चना परेश ठाकूर, पालक शिक्षक प्रतिनिधी स्वप्नाली किरण मोरे व दिपिका काळे तसेच, इंग्रजी माध्यम माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका नीरजा अधूरी, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका निलिमा शिंदे, इंग्रजी माध्यम पूर्व प्राथमिक विभागाच्या पर्यवेक्षिका वैशाली पारधी उपस्थित होत्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार विद्या जाधव, श्रद्धा म्हात्रे व प्रीती जेना यांनी मानले. तसेच श्रद्धा म्हात्रे व दिपाली आमले यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर नृत्याविष्काराचे सादरीकरण करून कार्यक्रमाला चार चांद लावले. कार्यक्रम यशस्वीपणे पार पडण्यासाठी सर्व शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचार्यांनी मुख्याध्यापिका निलिमा शिंदे व पर्यवेक्षिका वैशाली पारधी यांच्या मार्गदर्शनाखाली परिश्रम घेतले.

## उरण येथे 'हर घर तिरंगा'

**उरण : प्रतिनिधी**

देशभक्तीचा भक्तीचा जाज्वल्य इतिहास जनमानसात कायमस्वरूपी राहावा, या उद्देशाने राज्यात हर घर तिरंगा अभियान मोठ्या प्रमाणावर राबवण्यात येत असून, उरण येथे तहसीलदार डॉ. उद्धव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी (दि.१३) उरण तहसील कार्यालया समोर उरणचे निवडणूक नायब तहसिलदार प्रभाकर नवाळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



उरण तहसिल कार्यालयामार्फत हर घर तिरंगा अभियान राबविण्यास सुरुवात झाली आहे. या वेळी भारत माता की जय, वंदे मातरम आशा देशभक्तीपर घोषणा देऊन स्वातंत्र्याचा जयजयकार केला. या वेळी हर घर तिरंगा अर्थात घरोघरी तिरंगा अभियान राबविण्याची माहिती निवडणूक नायब तहसीलदार प्रभाकर नवाळे यांनी नागरिकांना देऊन, नागरिकांच्या मनात स्वातंत्र्य लढ्याच्या स्मृती जागृत केल्या.

या वेळी उरण महसूल सहाय्यक तहसिल कार्यालयाचे दीपक पाटील, प्रतिक पूर्व, आसिफ शेख, राजकुमार भाले, राजू चव्हाण तसेच निवृत्त अव्वल कारकून तानाजी पाटील यांच्यासह कर्मचारी जगदीश पाटील, बी.एन.भोपी, ललिता पाटील आदी उपस्थित होते.

## पनवेलमध्ये 'इनरव्हील'च्या प्रदर्शनाचे उद्घाटन







**पनवेल : रामप्रहर वृत्त**

इनरव्हील क्लब ऑफ पनवेल इंडस्ट्रहयल टाऊन यांच्या वतीने सुखकर्ती नावाच्या भव्य प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. पनवेल शहरातील गोखले हॉलमध्ये आयोजित प्रदर्शनाचे उद्घाटन वर्षा प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते बुधवारी (दि.१३) झाले.

या वेळी माजी उपमहापौर चारुशीला घरत यांनीही प्रदर्शनाला भेट देऊन शुभेच्छा दिल्या. हे प्रदर्शन १३ आणि १४ ऑगस्टदरम्यान पनवेलच्या गोखले हॉलमध्ये भरवले आहे. या प्रदर्शनात महिलांसाठी फॅशन, ज्वेलरी, साड्या आणि विविध प्रकारचे खाद्यपदार्थ उपलब्ध आहेत. यासोबतच, महिलांसाठी एचबी आणि एचजीटी टेस्ट सोयदेखील करण्यात आली असून प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन आयोजकांनी केले आहे.

प्रदर्शनाच्या उद्घाटनावेळी माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर, रुचिता लोंढे, नीता माळी, प्रेसिडेंट मेघना चांदोरकर, क्लबच्या संस्थापिका वृषाली सावळेकर, शुभांगी वालेकर, कल्पना नागावकर, शुभांगी बहिरा, देवयानी पोटे, डॉ. साधना गांधी, वैशाली ठाकरे, प्रतिभा लादे, डॉ. जयश्री पाटील, अनिता पन्हाळे दीप्ती कांडपीळे, ज्योती गुंडेचा आदी महिला उपस्थित होत्या.

## संपादकीय

# व्यवहार्य उपायाची गरज

भटक्या कुत्र्यांसाठी नुसते शेल्टर होम उभारून भागणार नाही. या कुत्र्यांच्या खाण्यापिण्याची, औषधपाण्याचीही सोय करावी लागेल. त्याकरिता कर्मचारी वर्गही नेमावा लागेल. बंदिस्त राहणे भटक्या कुत्र्यांना मानवणार नाही. त्यातून त्यांचा हिंस्त्रपणा वाढेल. त्याचे काय करणार हा प्रश्नही आहेच. शेल्टर होममध्ये आणून ठेवल्यानंतरही या कुत्र्यांचे निर्बिजीकरण व लसीकरण करावेच लागेल. त्यासाठीही प्रशिक्षित मनुष्यबळ लागेल व खर्चही येईल. एकंदरच असे शेल्टर होम उभारणे हे मोठे खर्चिक काम असणार आहे.

**भटक्या कुत्र्यांची समस्या देशभरात जाणवत असल्याचे माध्यमांमधून व समाजमाध्यमांवरही दिसते. अलीकडेच राजधानी दिल्लीतील भटक्या कुत्र्यांना रस्त्यांवरून हटवून निवारा केंद्रांमध्ये ठेवण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने प्रशासनाला दिले. त्यामुळे या प्रश्नावरील चर्चा पुन्हा सुरू झाली आहे. भटक्या कुत्र्यांनी पादचाऱ्यांना चावण्याच्या घटना अत्यंत भयानक आहेत. त्यांच्या हल्ल्यांमुळे लहान मुले रेबीजचे बळी ठरत आहेत असे निरीक्षण सर्वोच्च न्यायालयाने निकालात नोंदवले आहे. दिल्लीमध्ये एका लहान मुलीला भटका कुत्रा चावल्याने रेबीज झाल्याचे वृत्त वाचून सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांच्या मुद्यावर स्वत:हून खटला दाखल करून घेतला. दिल्ली सरकार तसेच गुरुग्राम, नोएडा आणि गाझियाबादच्या पालिकांनी सर्व भटके कुत्रे निवारा केंद्रांमध्ये (शेल्टर होममध्ये) पाठवावेत असे निर्देश खंडपीठाने दिले. भटक्या कुत्र्यांना हटवण्याच्या कामात कोणी बाधा निर्माण केल्यास त्या व्यक्ती वा संघटनेच्या विरोधात न्यायालयाचा अवमान केल्याप्रकरणी कठोर कारवाईचे निर्देश देऊ असे सर्वोच्च न्यायालयाने सुनावले आहे. व्यापक जनहितासाठी आपण हा निर्देश देत असल्याचेही सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे. भटके कुत्रे रस्त्यांवरून हटवले जाणार ही कल्पना कुत्र्यांची दहशत वाटणाऱ्या कुणालाही दिलासा वाटेल अशीच आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्री व त्यांच्या अन्य सहकाऱ्यांनीही या आदेशाचे स्वागतच केले आहे. पण सर्वोच्च न्यायालयाचा हा आदेश व्यवहार्य नसल्याची प्रतिक्रियाही या आदेशासंदर्भात दिसते आहे. न्यायालयाचा आदेश अवास्तव आणि आर्थिकदृष्ट्या परवडणारा नसल्याचे माजी केंद्रीय मंत्री आणि प्राणीप्रेमी मनेका गांधी यांनी म्हटले आहे. राजधानीतील कुत्र्यांची नेमकी संख्या जी काही आठ किंवा दहा लाख इतकी सांगितली जाते, ते पाहता प्रचंड संख्येने शेल्टर होम उभारावे लागतील असे दिसते. कुत्र्यांचे खाणेपिणे, औषधोपचार आदी व्यवस्थापनाच्या खर्चाचा भार कुणी आणि कसा पेलायचा याबद्दल न्यायालयाने काही म्हटलेले नाही, पण दिल्ली सरकार व उल्लेखलेल्या पालिकांनी तो उचलणे अपेक्षित असावे. निर्बिजीकरण योग्य प्रकारे न झाल्यामुळेच भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे असे सांगितले जाते. तसेच पाळीव कुत्र्यांना मालकांनी सोडून देण्याचे प्रकारही आढळून येत असतात, त्यांचे काय करायचे हा प्रश्नही आहेच. उकिरड्यांवरचे वाट्टेल ते पदार्थ खाल्ल्यामुळे कुत्र्यांमध्ये हिंस्त्रपणा वाढला आहे हा घटक या प्रश्नी तोडगा काढताना आपण अजिबातच विचारात घेणार नाही का, असा प्रश्न श्वानप्रेमी मंडळींकडून विचारला जातो आहे. एकंदरच या प्रश्नावर तोडग्याचा विचार करताना प्राणीप्रेमी संस्था, कार्यकर्ते व स्थानिक प्रशासन यांच्या समन्वयातून प्रभावी निर्बिजीकरण, कालबद्ध लसीकरण आदी कार्यक्रम हाती घ्यायला हवेत अशी भूमिका श्वानप्रेमींकडून नेहमीच मांडली गेली आहे. सर्वोच्च न्यायालयाने सुचवलेल्या उपायाची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू झाल्यावर तो कितपत व्यवहार्य व प्रभावी आहे हे स्पष्ट होईलच.**

# शेतकऱ्यांनी खरीपातील किडरोगाबाबत जागृत राहावे



पोलादपूर तालुक्यातील किसान गप्पा गोष्टी कार्यक्रमामध्ये रोहा येथील कीडरोग तज्ज्ञ जीवन आरेकर यांचे मार्गदर्शन ऑगस्ट महिन्यात झाले. या मार्गदर्शनाचा गोषवारा शेतकरी बांधवांसाठी येथे देत आहे. सध्या खरीप हंगामातील सर्व पिकांची पेरणी लावणी पूर्ण झालेली आहे. भात खाचरे हिरवीगार दिसत आहेत. सर्वदूर हवामान पिक वाढीसाठी अत्यंत पोषक असून समाधानकारक पाऊस पडत आहे. आपल्या भात, नाचणी इत्यादी खरीप पिके व भाजीपाला पिकांचे पिकांवर येणाऱ्या किडी व रोगांपासून पिकांचे संरक्षण करण्याची आज शेतकरी बांधवांची खरी जबाबदारी आहे.

खरीप हंगामामध्ये वातावरणातील बदलांमुळे पिकांवर विविध किड व रोग यांचा प्रादुर्भाव आढळून येतो. त्यामध्ये प्रामुख्याने पोलादपूर तालुक्यातील कापडे परिसरामध्ये खरीप हंगाम सन २०२३मध्ये भात पिकावर निळे भुंगेरे या किडीचा प्रादुर्भाव आढळून आला होता. वेळेवर शेतकरी तसेच कृषि विभागाचे क्षेत्रिय अधिकारी यांनी किड नियंत्रण उपाय करुन किड नियंत्रण मिळविण्यात यश मिळवले होते.

सध्य परिस्थितीमध्ये पाऊसमान चांगले असून मध्येच पावसाच्या जोरदार सरी कोसळत आहेत. भात पिक वाढीच्या कालावधीमध्ये भात शेतीमधील पाण्याचे नियोजन करणे पिक वाढीच्या व किडी–रोगांच्या नियंत्रणासाठी अत्यावश्यक बाब आहे. भात लावणीनंतर सुरुवातीच्या १ महिना कालावधीमध्ये २ ते ३ सेमी उंची इतके पाणी शेतामध्ये बांधून ठेवणे अत्यंत गरजेचे आहे. १ महिन्यानंतर म्हणजे आताच्या परिस्थितीमध्ये भात पिकाचे दाणे तयार होइपर्यंत ५ सेमी उंची इतके पाणी बांधून ठेवणे गरजेचे आहे. यासाठी शेतामध्ये वारंवार पाणी बांधून ठेवण्यासाठी व जास्तिच्या पाण्याचा निचरा होणेसाठी बांधबंदीस्ती व निचरा चर शेतकरी यांनी तयार केले पाहिजेत तसेच शेतीचे बांध व इतर मोकळी जागा गवत काढून स्वच्छ ठेवली पाहिजे.

हंगामामध्ये पडणारा जास्तिचा पाऊस यामुळे भातशेतीमध्ये दलदल तयार होते, जमिन पाणथळ होते तसेच पाण्याचा निचरा योग्य प्रकारे होत नाही. यामुळे भात पिकावर निळे भुंगेरे, तपकिरी तुडतुडे या किडींचा मोठया प्रमाणावर प्रादुर्भाव होतो आणि पिकाचे नुकसान होते. निळे भुंगेरे भात पिकावर पडणारी एक महत्वाची किड आहे. या किडीची अळी आणि प्रौढभुंगे या दोन्हीही अवस्था भात पिकासाठी नुकसान कारक आहेत. किडीचे भुंगेरे गर्द निळया रंगाचे असतात तर अळी भुरकट पांढऱ्या रंगाची असते. किड पानाचा हिरवा भाग खरडवून खाते त्यामुळे पानांवर पांढरे पटटे दिसून येतात. भात कापणी नंतर किड बांधावरील गवतावर किंवा कापणीनंतरच्या भाताच्या फुटव्यांवर उपजिवीका करते आणि पुढील हंगामामध्ये भात पिकावर प्रादूर्भाव करते.

**खबरबात**
**शैलेश पालकर**

त्यामुळे भात लावणीनंतर बांध स्वच्छ ठेवणे व कापणीनंतर नांगरणी करुन भाताची धस्कटे समूळ काढून टाकणे म्हणजे जमिनीतील ओलाव्यामुळे पुन्हा फुटवा न येता किडीचे प्रसारास प्रतिबंध होतो. रासायनिक पध्दतीने किड नियंत्रणासाठी प्रती हेक्टरी ५०० लिटर पाण्यातून क्विनॉलफॉस २५ टक्के २ लिटर किंवा लॅमडासायहॅलोथ्रिन ५ टक्के २५० मिली या पैकी एका किटकनाशकाची फवारणी घ्यावी.

सुरळीतील अळी या किडीचे फुलपाखरु लहान, नाजूक दुधाळ पांढऱ्या रंगाचे असते. पंखावर फिकट काळे लहान लहान ठिपके असतात. अळी पारदर्शक फिकट हिरवट पांढरट असते. अळी अवस्था ही प्रचंड हानिकारक असते. अळी कोवळी पाने कापून त्याचे लहान लहान तुकडे करुन त्याची सुरळी करुन त्यात राहते आणि रात्रीच्या वेळी अळी सुरळीसह भाताच्या आव्यावर चढते व पानातील हरितद्रव्य खरडवून खाते. त्यामुळे भाताच्या पानांवर पांढरे पटटे दिसून येतात, शेत निस्तेज दिसते, पिकाची वाढखुंटते. सुरळया पानांच्या एका कडेस लटकत किंवा पाण्यावर तरंगत असलेल्या दिसतात. या किडीच्या नियंत्रणासाठी शेतात पाणी बांधून ठेवून पिकावरुन एक जाड दोर आडवा धरुन ओढत न्यावा. त्यामुळे सुरळया पाण्यात पडतात. नंतर एक दोन तासांनी शेतातील पाणी एका बाजूने पाटाच्या सहाय्याने बाहेर काढून जमा झालेल्या सर्व सुरळया एकत्र करुन नष्ट कराव्यात जेणेकरुन किडीचा चांगल्या प्रकारे बंदोबस्त होईल. आवश्यकता वाटल्यास फेनथोएट ५०टक्के प्रवाही किटकनाशक १ लि. ५०० लिटर पाण्यातून प्रति हेक्टरी फवारणी करावी.

तपकिरी तुडतुडे ही आपल्या परिसरामध्ये भात वाढीच्या मध्यावधी कालावधीत मोठया प्रमाणात आढळून येते. भात लागवड घट केली असेल तसेच शेतीमध्ये पाण्याचा निचरा योग्य होत नसेल किंवा युरिया खतांचा अतिप्रमाणात वापर केला असेल तर तपकिरी तुडतुडे या किडीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात आढळून येतो. भातशेतीमध्ये मध्यभागी तुडतुडयांच्या प्रादुर्भावामुळे करपून गेलेले गोलाकार भाताचे पिक दिसते, यालाच 'हॉपर बर्न असे म्हणतात. तुडतुडे व त्यांची पिल्ले भाताच्या खोडातून अन्नरस शोषूण घेतात. त्यामुळे भात पाने पिवळी पडतात आणि नंतर वाळतात, भात पिक करपून जाते. अशा भात रोपांमधून लौब्या बाहेर पडत नाहीत, जर लांब्या आल्याच तर त्या पोचट असतात. किडीच्या नियंत्रणासाठी भात लागवड दाट करु नये यासाठी २० सेमी १५ सेमी. अंतरावर लागवड करणे, पटटा पध्दतीची लागवड सोईची ठरते. शेतातील पाण्याचा निचरा करणे अत्यंत आवश्यक आहे. ॲसिफेट ७५ टक्के १०४० ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ टक्के, १०० मिली. ५०० लिटर पाण्यातून प्रति हेक्टर फवारणी करणे आवश्यक आहे.

खरीप हंगामामध्ये खेकडयांद्वारे भातशेतीचे प्रचंड नुकसान होते. जमिनीपासून भाताचे रोप कापून खेकडे बिळामध्ये खाण्यासाठी नेतात. खेकडा नियंत्रणासाठी भातशेतीमध्ये बेडकांची पैदास करावी. बेडकांकडून खेकडयाची पिल्ले फस्त केली जातात. दर दोन तीन दिवसांनंतर बांधांवरील खेकडयांची संख्या कमी करावी.

कोकण परिसरात भात पिकावर करपा, कडाकरपा, शेंडे करपा, पर्णकोष करपा, आभासमय काजळी, उदबत्ता सारखे रोग प्रामुख्याने आढळतात. त्याचेही नियंत्रण करणे अत्यंत आवश्यक आहे. यासाठी भात शेतीची स्वच्छता खुप महत्वाची आहे. पिक कापणीनंतर शेतातील धस्कटे काढून नष्ट करावे. बांधावरील तणांचा नाश करावा. बांध बंदिस्ती करावी. जमिनीची खोल नांगरणी करावी. रोगप्रतिकारक जातींची लागवड करावी. पेरणीपूर्व भात बियाण्यास बिज प्रक्रिया करणे अत्यंत आवश्यक आहे. पिकास संतुलित खतांचा वापर करावा. करपा रोगाचा प्रादुर्भाव आढळल्यास कार्बेन्डॅझिम ०.१ टक्के, मॅन्कोझेब ०.२५ टक्के किंवा कॉपर ऑक्सीक्लोराईड ०.२५ टक्के २५ ग्रॅम १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

खरीप पिकांवरील कीडरोगाबाबत शेतकऱ्यांना कोणतीही तातडीची मदत घ्यावीशी वाटल्यास तालुका कृषी कार्यालय, मंडल कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक आणि कृषी सहायक यांच्यासह रोहे येथील किल्ला येथे असलेल्या कृषी संशोधन केंद्रातील जीवन आरेकर यांच्याकडे संपर्क साधण्याचे आवाहन आहे.

## बदलते तंत्रज्ञान

# भविष्यात अंतराळातही फोन कनेक्ट होणार

भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्त्रो) आता आणखी एक ऐतिहासिक टप्पा गाठण्याच्या तयारीत आहे. इस्त्रोने अलीकडेच जगातील सर्वात महागडा उपग्रह NISAR यशस्वीरित्या लॉन्च केला असून तो लवकरच अंतराळात सोडण्यात येणार आहे. या उपग्रहाच्या साहाय्याने मोबाईलमध्ये अंतराळ कनेक्टिव्हिटी मिळवणे शक्य होणार आहे.



ब्लॉक–२ ब्लूबर्ड हा एक प्रगत अमेरिकन उपग्रह आहे, जो थेट मोबाइल फोन डेटा आणि कॉल कनेक्टिव्हिटीसाठी तयार करण्यात आला आहे. या उपग्रहाद्वारे जमिनीवर किंवा हवेत, अगदी दुर्गम भागातसुद्धा थेट कनेक्टिव्हिटी मिळू शकते. अहवालानुसार या उपग्रहामध्ये ६४.३८ चौरस मीटरचा कम्युनिकेशन ॲरे आहे, जो थेट मोबाइल फोनशी जोडता येतो. हा उपग्रह ३GPP मानक फ्रिक्वेन्सीवर कार्य करतो, म्हणजेच तो ३G, ४G आणि ५Gसारख्या सध्या वापरल्या जाणाऱ्या मोबाईल नेटवर्क तंत्रज्ञानासोबत सुसंगत आहे.

या उपग्रहाची खासियत म्हणजे तो थेट उपग्रहातून स्मार्टफोनवर ब्रॉडबँड इंटरनेट सेवा प्रदान करतो, त्यासाठी कोणत्याही बेस टर्मिनलची आवश्यकता नसते. उपग्रहातील कम्युनिकेशन ॲरेद्वारे वापरकर्ते सुमारे १२ एमबीपीएस वेगाने डेटा ॲक्सेस करू शकतात. यामुळे जगभरातील टेलिकॉम कंपन्यांना एकत्रितपणे व्हॉइस कॉल, डेटा सेवा आणि व्हिडिओ कॉलिंगसारख्या सुविधा सहजपणे पुरवता येणार आहेत.

भारतामध्ये उपग्रहाद्वारे इंटरनेट सेवा सुरू करण्याची तयारी वेगाने सुरू आहे. एलोन मस्क यांची स्टारलिंक, तसेच जिओ आणि एअरटेल या कंपन्यांना देशात उपग्रह ब्रॉडबँड सेवा सुरू करण्यासाठी मंजुरी मिळाली आहे. लवकरच दूरसंचार विभाग स्पेक्ट्रमच्या वाटपाला परवानगी देणार असून, त्यानंतर या सेवा अधिकृतपणे सुरू होतील. स्टारलिंक आणि इतर उपग्रह इंटरनेट सेवा प्रदात्यांनी अलीकडेच 'डायरेक्ट टू स्मार्टफोन' या तंत्रज्ञानाची यशस्वी चाचणी पूर्ण केली. या तंत्रज्ञानामुळे वापरकर्त्यांचा स्मार्टफोन थेट उपग्रहाशी जोडला जाऊ शकतो. महत्त्वाचे म्हणजे आपत्कालीन परिस्थितीत, जसे की नैसर्गिक आपत्ती किंवा नेटवर्क खंडित झाल्यास ही सेवा अतिशय उपयुक्त ठरू शकते.

# लेखक, नाटककार, पत्रकार जयवंत दळवी



## निमित्त

जयवंत द्वारकानाथ दळवी हे मराठी लेखक, नाटककार, पत्रकार होते. त्यांचा जन्म १४ ऑगस्ट १९२५ रोजी गोव्यातील हडफडे येथे झाला. ते मूळचे सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वेंगुर्ला तालुक्यातील आरवली गावचे. त्यांनी जवळच्या शिरोडा गावी पाचवीपर्यंतचे शिक्षण घेतले. मॅट्रिक झाल्यावर मुंबईच्या व्हीजेटीआयमध्ये टेक्स्टाईल इंजिनिअरिंगचा डिप्लोमा घेण्यासाठी अभ्यास करू लागले, पण डिप्लोमा अर्धवट टाकून मुंबईच्या 'प्रभात' दैनिकात ते रुजू झाले.

'प्रभात'मधून दळवी 'लोकमान्य'मध्ये गेले. एमएसाठी त्यांनी 'इमोशन ॲन्ड इमॅजिनेशन ॲण्ड देअर प्लेस इन लिटरेचर' या विषयावर संशोधन करून प्रबंध सादर केला. अमेरिकन सरकारच्या मुंबई येथील माहिती खात्यात (युसिस) त्यांनी नोकरी स्वीकारली. लेखनासाठी पूर्ण वेळ मिळावा म्हणून त्यांनी वयाच्या पन्नासाव्या वर्षी १९७५ साली स्वेच्छानिवृत्ती स्वीकारली. साहित्यक्षेत्राला विनोदी फटके लगावणारा 'ठणठणपाळ' या टोपण नावानेही त्यांनी लेखन केले.


बालपणी त्यांच्यावर राष्ट्र सेवा दलाचे संस्कार झाले होते. श्रमदान मोहिमेत ते उत्साहाने भाग घेत. त्यांची पहिली कथा 'दातार मास्तर' १९४८मध्ये प्रसिद्ध झाली. त्यानंतर त्यांच्या लेखणीला बहर आला आणि विविध साहित्य प्रकार त्यांनी समर्थपणे हाताळले. 'गहिवर' (१९५६), 'एदीन' (१९५८), 'रुक्मिणी' (१९६५), 'स्पर्श' (१९७४) आदी १५ कथासंग्रह; 'चक्र' (१९६३), 'स्वगत' (१९६८), 'महानंदा' (१९७०), 'अथांग' (१९७७), 'अल्बम' (१९८३) आदी २१ कादंबर्या; 'संध्याछाया' (१९७४), 'बॅरिस्टर' (१९७७), 'सूर्यास्त' (१९७८), 'महासागर' (१९८०), 'पुरुष' (१९८३), 'नातीगोती' (१९९१) आदी १९ नाटके दळवींनी लिहिली.

'लोक आणि लौकिक' हे प्रवासवर्णन आणि 'सारे प्रवासी घडीचे' हे कोकणातील विलक्षण व्यक्तींचे आणि त्यांच्या जगावेगळ्या कर्तृत्वाचे, विक्षिप्तपणाचे चित्रण करणारे विनोदी पुस्तक वाचकप्रिय ठरले. माणसांची दु:खे आणि त्यामागल्या दडपल्या गेलेल्या भावना हे दळवींच्या लेखनाचे सूत्र होते. अशा या प्रतिभावान लेखकाचे १६ सप्टेंबर १९९४ रोजी निधन झाले.

जयवंत दळवी माणसात रमणारे असले तरी वृत्तीने एकाकी होते. महाराष्ट्र शासनाचे, नाट्य परिषदेचे अनेक पुरस्कार त्यांना लाभले होते, पण गर्दीपासून ते दूर राहिले. सभा–संमेलने टाळली. अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी नाकारले होते. जयवंत दळवी चतुरस्त्र प्रतिभेचे लेखक होते. मराठी साहित्याला त्यांनी दिलेले योगदान फार महत्त्वाचे आहे.

'ठणठणपाळ'विषयी ज्ञानपीठकार कविवर्य विंदा करंदीकरांनी म्हटले आहे की, ठणठणपाळच्या भूमिकेतून दळवींनी केलेल्या लिखाणाला व कार्याला तोड नाही. इतकी जागरूकता, इतके शहाणपण, इतका जिव्हाळा आणि परखडपणा मराठी समीक्षात्मक विभागाला अजूनपर्यंत लाभलेला नव्हता. **(साभार : इंटरनेट)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# पोक काढून बसायची सवय बिघडवते पोश्चर

पाठीला पोक काढून बसण्याची सवय म्हणजेच वाकून बसण्याची सवय. पाठीचा कणा वाकवायचा त्याला वळण द्यायचे आणि खांदे पुढे झुकवून बसायचे. ही अनेकांची दैनंदिन सवय झाली आहे. ऑफिसमध्ये दीर्घकाळ लॅपटॉपसमोर बसणे, मोबाईल हातात घेऊन तासनतास स्क्रोल करत राहणे किंवा आरामात सोफ्यावर बसून काम करणे या सर्वांमुळे ही सवय नकळत लागते. सुरुवातीला ही बसण्याची पद्धत अगदी सोयीची आणि आरामदायी वाटते. पाठीला बरे वाटते, पण हळूहळू ती शरीराच्या नैसर्गिक पोश्चरवर परिणाम करू लागते आणि आरोग्यावर गंभीर दुष्परिणामही करते.



सतत पाठीला पोक काढून बसल्याने कण्याचा नैसर्गिक आकार बिघडतो. मणक्यांवर ताण येतो ते आपल्याला जाणवतही नाही. हळूहळू दबाव वाढतो.या दबावामुळे मणक्याचे भाग झिजण्याचा वेग वाढतो. ज्यामुळे दीर्घकालीन पाठदुखी, सायटिका, मानदुखी आदी सारख्या समस्या उद्भवू शकतात. पाठीच्या वरच्या भागातील स्नायूंना सतत ताण येतो आणि खालच्या पाठीचे स्नायू कमकुवत होतात. खांदे पुढे वाकल्यामुळे खांद्यांमध्ये स्टिफनेस येतो. तर मान सतत पुढे राहिल्याने टेक्स्ट नेक सारखी समस्या वाढू शकते. या स्थितीमुळे डोकेदुखी, मानदुखी आणि खांदेदुखी वारंवार जाणवू शकते.

चुकीच्या बसण्यामुळे फक्त हाडे आणि स्नायूच नव्हे, तर शरीरातील इतर कार्यप्रणालीवरही परिणाम होतो. पाठ वाकवून बसल्याने छातीचा पिंजरा पूर्णपणे फैलावत नाही, त्यामुळे श्वसनाची क्षमता घटते. फुफ्फुसांना कमी हवा मिळाल्याने ऑक्सिजनचा पुरवठा कमी होतो आणि त्यामुळे थकवा, एकाग्रतेत घट आणि झोपेची गुणवत्ता कमी होऊ शकते. दीर्घकाळ चुकीच्या पोश्चरमुळे पचनक्रियेवरही परिणाम होतो, कारण पोटावर दाब आल्यामुळे अन्न नीट पचत नाही आणि ॲसिडिटी, अपचन अशा समस्या वाढतात.

पोक काढून बसण्याची सवय वाटते तेवढी साधी नाही. फक्त काही साधे त्रास होतात असे नाही पोक काढून बसण्याची सवय असल्यामुळे माणूस वया नुसार जसा मोठा होतो तसा त्याचा पाठीचा मणका कमकुवत होत जातो. म्हातारपणात पाठीला कुबड येण्याची शक्यता वाढते. त्यामुळे बसताना वाकडे तिकडे बसणे टाळा आणि स्वस्थ ताठ बसायची सवय लावून घ्या.

# महाड आगाराचे गणित कोलमडले

## कर्मचारी कमतरतेचा एसटी वेळापत्रकावर परिणाम



**महाड : प्रतिनिधी**

मुंबई गोवा महामार्गावरील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या महाड शहरातील एसटी आगाराचे गणित सध्या कोलमडले आहे. महाड एसटी आगाराला मंजूर पदांपेक्षा अनेक पद रिक्त असल्याने एसटीच्या वेळापत्रकावर परिणाम झाला आहे. या कोलमडलेल्या गणिताला सावरण्यासाठी ऐन गणेशोत्सवात पुरेसा कर्मचारी वर्ग असणे गरजेचे आहे.

गणेशोत्सव काही दिवसांवर येऊन ठेपला असून या गणेशोत्सवा करता कोकणातील लाखो गणेश भक्त आणि चाकरमणी कोकणात दाखल होतात. कोकणात येण्याकरता विशेष गाड्यांची सुविधा केलेली असली तरी अनेक जण एसटीचाच पर्याय स्वीकारतात. या गणेशोत्सवामध्ये गणेश भक्तांना परतीच्या प्रवासाला मात्र एसटीच्या कोलमडलेल्या वेळापत्रकाचा सामना करावा लागणार आहे. महाड एसटी आगारामध्ये निम्म्याहून अधिक कर्मचाऱ्यांच्या जागा रिक्त आहेत. याचा परिणाम एसटीच्या फेऱ्यांवर होत असून अनेक गाड्या रद्द करण्याची पाळी महाड एसटी आगारावर आली आहे. गेले अनेक दिवसांपासून महाड मुंबई सेंट्रल या गाड्या रद्द करण्यात आल्या होत्या त्यातच लांब पल्ल्यासाठी जाणाऱ्या गाड्या देखील बंद ठेवल्या. महाड एसटी आगारांमध्ये चालक वाहक सफाई कर्मचारी वाहतूक निरीक्षक अशा अनेक पदांमधील जागा रिक्त आहेत. गणेशोत्साह मध्ये अशीच परिस्थिती कायम राहिली तर उर्वरित कर्मचाऱ्यांवर कामाचा प्रचंड ताण निर्माण होणार आहे.

गणेशोत्सवामध्ये एसटी महामंडळाच्या आगारांकडून एसटीचे उत्पन्न वाढीसाठी विशेष प्रयत्न केले जातात. महाड एसटी आगार देखील यामध्ये मागे नाही. महाड तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये समूह आरक्षण करून एसटी बसेस थेट गावातच जाऊन प्रवाशांना मुंबई पुणे अशा विविध शहरात घेऊन जात आहे. महाड आगारामध्ये यापूर्वी अनेक वेळा चालक वाहक आणि इतर कर्मचारी वर्गाची मागणी करून देखील दुर्लक्ष केले जात आहे. आता पुरेशा गाड्या असल्या तरी या गाड्या चालवण्यासाठी पुरेसा कर्मचारी वर्ग नसल्याने अनेक फेऱ्या रद्द करण्याची वेळ महाड आगारावर आली आहे. महाड एसटी आगारामध्ये ३८ आणि तेवढेच वाहक संख्या रिक्त आहे. महाड एसटी आगारातून ३५७ लोकल आणि लांब पल्ल्याच्या फेऱ्या सुरू आहेत. या ठिकाणी एसटीने घेतलेल्या ४४ खाजगी बसेसच्या फेऱ्या सुरू आहेत. महाड एसटी डेपो कडे यापूर्वी गाण्यांचा तुटवडा जाणवत होता मात्र आता जवळपास दहा नवीन गाड्या एसटीच्या ताफ्यात दाखल झाले आहेत. गाड्या आल्या असल्या तरी वाहकांची संख्या कमी असल्याने महाड मधील प्रवाशांना अन्य आगारातील एसटी बसेस वर अवलंबून राहावे लागत आहे.

मुंबई-गोवा महामार्गावरील महाड हे ऐतिहासिक ठिकाण असून या ठिकाणी अद्ययावत सुविधा आणि सुसज्ज असे बस स्थानक असणे गरजेचे होते, मात्र या ठिकाणी जुन्याच इमारतीवर नवा रंग देऊन लाखो रुपये वाया घालवले जात आहेत. या ठिकाणी सुरू असलेल्या नवीन बस स्थानकाचे काम देखील अपूर्ण अवस्थेत आहे. संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये महाड एसटी आगारामध्ये सर्वाधिक मोठी जागा त्यांच्या ताब्यात आहे, मात्र स्थानिक लोकप्रतिनिधींच्या दुर्लक्षामुळे महाड एसटी आगार आणि परिसराची वाता हात झाली आहे. त्यातच आगाराच्या मधोमध काँक्रीट काम केल्यामुळे संपूर्ण आगारात पाणी साचून तळ्याचे रूप येत आहे.

या ठिकाणी शौचालयदेखील चुकीच्या पद्धतीने बांधलेले आहे. सध्या सुरू असलेली महाड एसटी आकाराच्या नवीन बस स्थानकाचे बांधकामदेखील नियोजनबद्ध नसल्याने एसटीच्या जागेचे तुकडे होत आहेत.

### अशी आहेत रिक्त पदे

***चालक, वाहक : ३७ पदे रिक्त,पाळी प्रमुख : ३ मंजूर पैकी ३ रिक्त,वाहन परीक्षक : ३ मंजूर पैकी रिक्त ३ रिक्त, टायर फिटर : २ मंजूर पैकी २ रिक्त, यांत्रिक : ४९ मंजूर पैकी ११ रिक्त, सफाई कामगार : ५ मंजूर पैकी ५ रिक्त, आगार लेखाकार : १ मंजूर पैकी १ रिक्त,वरिष्ठ लिपिक : ३ पैकी २ रिक्त,सहा. वाहतूक निरीक्षक: १ मंजूर १ रिक्त, सहा. कार्यशाळा अधिकारी १ मंजूर १ रिक्त***

**काही दिवसांवर गणेशोत्सव आल्याने महाड आगाराकडे पुरेसा कर्मचारी असणे गरजेचे आहे. प्रवाशांची गैरसोय होणार नाही याची देखील काळजी घेतली पाहिजे. थेट गावातून आणि रेल्वे स्थानकावरून गणेशभक्तांना सोडण्याची व्यवस्था झाली पाहिजे.**

**-कमलेश कोर्पे, सामाजिक कार्यकर्ता**

# अल्पवयीन मुलावर लैंगिक अत्याचार

**रेवदंडा : प्रतिनिधी**

रेवदंडा पोलिस ठाणे हद्दीतील अलिबाग तालुक्यातील रामराज-आंबेवाडी आदिवासी वाडीवर एका अल्पवयीन मुलाने दुसऱ्या अल्पवयीन मुलावर लैगिक अत्याचार केल्याची खळबळ उडविणारी घटना घडली.

रामराज-आंबेवाडी आदिवासी वाडी येथे ११ ते १२ ऑगस्टदरम्यान फिर्यादी यांचा मुलगा वय ४ वर्षे २ महिने हा गावातील बुरूमखाना नजीक खेळत असताना, फिर्यादी यांचे शेजारी राहणारा अल्पवयीन आरोपी याने फिर्यादीचा मुलगा अल्पवयीन असल्याचे माहीत असल्याचा फायदा घेउन बुरूमखाना नजीकच्या जाळकाटी झुडूपात नेवून तेथे लैगिंक अत्याचार केले. यामुळे त्यांचे शौचालयाचे जागेवर रक्तस्त्राव झाला, अशी तक्रार पिडीत अल्पवयीन मुलाच्या पाल्याने रेवदंडा पोलीस ठाणे येथे दिली आहे. त्यानुसार रेवदंडा पोलीस ठाणे येथे १०२/२०२५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास रेवदंडा पोलीस ठाण्याचे पोसई श्रीराम पडवळ हे करत आहेत.

# खालापूर तालुका भाजपची नूतन कार्यकारिणी जाहीर

**खोपोली : प्रतिनिधी**

भाजपमध्ये संघटना वाढीसाठी नवीन कार्यकर्त्यांना संधी मिळावी यासाठी खालापूर तालुका मंडळ अध्यक्ष सनी यादव यांनीही आपली नूतन कार्यकारणी घोषित केली आहे

यानुसार युवा मोर्चा अध्यक्ष नागेश पाटील, महिला मोर्चा श्वेता मनवे, ओबीसी मोर्चा भरत महाडिक, अनु जाती मोर्चा भाऊ गायकवाड, अनु जमाती मोर्चा मनोहर पवार, किसान मोर्चा रुमाजी मोरे, अल्पसंख्याक मोर्चा मुनीर धनसे, वैद्यकीय सेल डॉ जयंत फेगडे, उत्तर भारतीय सेल अवधेश सिंग, उद्योग सेल रवींद्र मोरे, विधी सेल संदेश वनगे, कामगार सेल निलेश साळुंखे, अध्यात्मिक आघाडी किसन सपकाळ, सोशल मीडिया सेल अनिकेत साळुंखे, खालापूर शहराध्यक्ष जयेश पाटील, खालापूर मंडल प्रसिद्धीप्रमुख दीपक जगताप. नवनियुक्त पदाधिकाऱ्यांनी भाजपच्या ध्येयधोरणानुसार तळागाळाच्या लोकांपर्यंत पोहोचून पक्षाची ध्येय धोरणे समजावून सांगणे त्याप्रमाणे विद्यमान शासनाची या योजना आहेत त्याची माहिती सर्वसामान्यांना द्यावी, असे आवाहन खालापूर तालुका मंडळ अध्यक्ष सनी यादव यांनी कार्यकर्त्यांना केले आहे.


**सहनिबंधक सहकारी संस्था (सिडको)**
**यांचे कार्यालय**
शहर व औद्योगिक विकास महामंडळ, (महाराष्ट्र) मर्यादीत
बेलापुर रेल्वेस्टेशन कॉम्प्लेक्स, टॉवर नं.०८, पाचवा मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई
ई-मेल : jointregcidco@gmail.com

जा.क्र.सनि/ससं/ सिडको/९७७/२०२५ दिनांक :-११/०८/२०२५

**महाराष्ट्र मालकी हक्काच्या सदनिकांबाबत त्या बांधण्यास प्रोत्साहन देणे, त्यांची विक्री व्यवस्थापन व हस्तांतरण यांचे नियम करण्याचावत) अधिनियम १९६३ चे कलम १०(१) नियम १३(२) प्रमाणे (नमुना १०) अन्वये जाहिर नोटीस अर्ज क्र. ८०/२०२५**

श्री. राजेंद्र बन्सी भोर, मुख्यप्रवर्तक नियोजित मंगल मूर्ती रेसिडेन्सी सहकारी गृहनिर्माण संस्था भुखंड क्र. ए-३०, सेक्टर १५.उलवे, नवी मुंबई — अर्जदार

विरुध्द

१) मेसर्स माँ भवानी रिअल्टर्स तर्फे भागिदार, श्री. जबरसिंग भोपसिंग राजपूत पत्ता- शॉप नं. ०६, संजय सीएचएस, भूखंड क्र. १९. सेक्टर ०३ ई, कळंबोली, नवी मुंबई
२) उपनिबंधक सहकारी संस्था, सिडको बेलापूर रेल्वे स्टेशन कॉम्प्लेक्स. टॉवर नं. ०८. पाचवा मजला, सी.बी.डी बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४ — जाब देणार

अर्जदार यांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह नियोजित संस्थेचा विकासक असहकार्य अंतर्गत नोंदणी प्रस्ताव या कार्यालयात दि. ११/०७/२०२५ रोजी दाखल केला आहे. सदर प्रस्तावाचे अनुषंगाने या कार्यलयात दिनांक ०४/०८/२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. सदर सुनावणीची नोटीस प्रतिवादी यांना रितसर पोस्टाने पाठवूनही ते सुनावणी गैरहजर राहिले आहेत,

सदर प्रकरणी अंतिम सुनावणी **दिनांक १८/०८/२०२५ रोजी** या कार्यालयात **दुपारी ०३.०० वाजता** आयोजित करण्यात आली आहे. सदर सुनावणीस वादी /प्रतिवादी तसंच ज्या व्यक्तीचे/संस्थाचे हक्क बादीत होणार आहेत अशा सर्वांनी आवश्यक त्या कागदपत्रांसह उपस्थित राहून म्हणने मांडण्यास्तव यांना या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येत आहे.

**सही/-**
**(राजेंद्र वीर)**
**सक्षम प्राधिकारी मोफा अधिनियम १९६३ तथा सहनिबंधक, सहकारी संस्था, सिडको,**


# श्रवण यादवचे परीक्षेत यश

**महाड : प्रतिनिधी**

महाराष्ट्र उपयोजित कला आणि हस्तकला सामायिक प्रवेश परीक्षा २०२५ चा नुकताच निकाल जाहीर झाला असून, महाड तालुक्यातील भेलोशी गावचा सुपुत्र श्रवण संतोष यादव याने या परीक्षेत राज्यात तिसरा क्रमांक मिळवत आपले देदिप्यमान यश सिद्ध केले आहे.

प्रतिकूल परिस्थितीवर मात करत, प्रचंड मेहनतीने हे यश मिळवणाऱ्या श्रवणने २०० पैकी १७३ गुण मिळवून राज्यभरातून २००० पेक्षा अधिक विद्यार्थ्यांमध्ये आपली चमक दाखवली. या यशानंतर श्रवणवर विविध स्तरांतून अभिनंदनाचा आणि कौतुकाचा वर्षाव होत आहे. एप्रिल २०२५ मध्ये मुंबईत झालेली ही परीक्षा संकल्पचित्र, स्मरणचित्र, वस्तूचित्र आणि सामान्य ज्ञान या विषयांवर आधारित होती. या निकालानंतर डिग्री शिक्षणाकरिता सर जे.जे. स्कूल ऑफ आर्ट महाविद्यालयामध्ये प्रवेश होत असल्याने आपण भारावून गेल्याची प्रतिक्रिया श्रवणने व्यक्त केली आहे.


**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकांकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :-

**मौजे-बोर्ले, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड.**

| भूमापन नं./ हिस्सा.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ९८/२/ब | ०-२९-१० पैकी ०-१४-५५ | २.७२ | मनिषा गंगाराम पाटील<br>कल्याणी पुंडलिक पाटील<br>केवल पुंडलिक पाटील<br>मथुरा पुंडलिक पाटील<br>माईबाई काशिनाथ मुंढे<br>शांताबाई विष्णू मुंढे<br>जनाबाई लक्ष्मण माळी<br>दिनेश अर्जुन पाटील<br>निधी नितिन गायकर<br>सुषमा अर्जुन पाटील |
| १३३ | ०-१९-०० पैकी ०-०९-५० | १.६० | |
| १३९/२ | ०- २१-०० पैकी ०-१०-५० | १.७५ | |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ५ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १३/०८/२०२५**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ, अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल.
मो.क्र. : ९९३०३६९८६१


# माणगावची प्रसिद्ध काकडी बाजारात दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

काकडी लागवडीसाठी माणगाव तालुका प्रसिद्ध असून पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात काकडीची लागवड केली जाते. डोंगर उतारावर खास पद्धतीचे आले करून आणि मांडव घालून शेतकरी काकडीची लागवड करतात. पावसाळ्याच्या दिवसात दुसरे कोणतेच फळ पीक घेता येत नसल्याने शेतकरी काकडीचे उत्पादन घेतात. या दिवसात काकडीलाही चांगली मागणी असते. काकडीची खास नामदेव उमाजी, पद्मिनी, झेनिया इत्यादी बियाणे लागवड करून मोठ्या प्रमाणावर काकडीचे उत्पादन शेतकरी घेत आहेत.

गेल्या महिन्यापासून पावसाने चांगली सुरुवात केल्यामुळे काकडीच्या वेली तरारून आल्या आहेत. येथील काकडी पनवेल, महाड, पेण या बाजारात विक्रीसाठी जातात. उत्पादन कमी असल्याने ४० ते ५० रुपये प्रति किलो बाजारभाव मिळत आहे. श्रावणातील सण उत्सव व उपवास लक्षात घेता गणपतीपर्यंत काकडीचा बाजार तेजीत राहतो.

हल्ली शेतकरीही घाऊक बाजारात काकडी न विकता किरकोळ विक्री करण्यास पसंती देतात. पावसाळी दिवसात व्यवसायाच्या दृष्टीने दुसरे कोणतेच पीक घेता येत नाही. कलिंगड, भाजीपाला या दिवसात अतिपावसामुळे होत नाही, मात्र काकडीचे पीक चांगले येते त्यामुळे या दिवसात आम्ही काकडीचे पीक घेतो .आता सुरुवात झाली आहे गणपती पर्यंत काकडीला चांगला बाजार मिळेल, असे शेतकरी रामदास जाधव यांनी सांगितले.

# जिल्हा परिषदेची सिद्धेश्वर शाळा झाली दीडशे वर्षांची

**पाली : प्रतिनिधी**

सुधागड तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद सिद्धेश्वर शाळेला तब्बल दीडशे वर्षे पूर्ण झाली आहेत. शाळेचा शतकोत्तर सुवर्ण महोत्सव माजी विद्यार्थी व मान्यवरांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात व अनोख्या पद्धतीने झाला. या वेळी शाळेला आकर्षक सजावट करण्यात आली होती.

ही शाळा ६ ऑगस्ट १८७६ रोजी स्थापन झाली. शाळेच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सव वर्धापन दिन कमिटीने नियोजनबद्ध रीतीने साजरा केला. या वेळी या शाळेमध्ये शिकलेले माजी विद्यार्थी विलास दुर्वे व नंदकुमार सुरावकर हे या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित होते.

कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून माजी विद्यार्थी विष्णू मंचेकर हे होते. तसेच या कार्यक्रमासाठी सुधागडचे तहसीलदार उत्तम कुंभार, गटविकास अधिकारी लता मोहिते, गटशिक्षणाधिकारी साधुराम बांगारे, ग्रुप ग्रामपंचायत सरपंच आशिका पवार उपसरपंच शरद किंजावडे, सदस्या समृद्धी यादव, केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे तसेच उद्योजक चंद्रशेखर दुर्वे परमानंद राइलकर नगरसेवक मुंबई दत्तात्रय पोंगडे ठाणे, पुणे व मुंबई वरून आलेले माजी विद्यार्थी, गावातील ग्रामस्थ व तरुण मंडळी अशा सगळ्यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडला. शाळेच्या वाढदिवसानिमित्त साक्षी यादव यांनी शाळेला इन्व्हर्टर भेट दिला आहे. तसेच शाळेतील विद्यार्थ्यांना शतकोत्तर सुवर्ण महोत्सव सोहळा निमित्ताने वृक्ष भेट देखील देण्यात आली.

यावेळी केंद्रप्रमुख कैलास म्हात्रे, मुख्याध्यापिका रोहिणी खामकर, शिक्षक जनार्दन भिलारे, स्वप्नाली मेमाणे, प्रिया काळे यांना सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

वर्धापन दिन कमिटी अध्यक्ष अविनाश कोनकर उपाध्यक्ष संजय शिंदे, श्रीपत पवार, कृष्णा वाघमारे शाळा व्यवस्थापन कमिटी अध्यक्ष रवींद्र यादव सचिन मुंढे, आशिष पोंगडे, नितीन यादव, वर्षा सुरावकर, सुरेखा यादव, संतोष यादव, संतोष जाधव या सर्वांनी मेहनत घेऊन कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगेश सुरावकर व जनार्दन भिलारे यांनी केले.

# रसायनी परिसरात साहित्यरत्न डॉ. अण्णा भाऊ साठे जयंती



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी परिसरातील कष्टकरीनगर येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांचे १०५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, जगदीश पवार, अविनाश गाताडे, चंद्रकांत भोईर, रंजना गायकवाड, अरुण गोडघाटे व इतर मान्यवरांच्या हस्ते शालेय विद्यार्थ्यांना वह्या वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमाच्या वेळी प्रमुख उपस्थित, दीपक कांबळे उपसरपंच, रिया माळी माजी उपसरपंच, संतोष वाघमारे, प्रदीप माळी, प्रतीक भोईर, दीपक इंगळे, सुनील राठोड, आशिष जाधव, उपस्थित होते. आलेल्या पाहुण्यांचे स्वागत रोहित काळोखे, लंकेश खवले, सुरेश म्हस्के, मयूर गायकवाड, विनोद कांबळे, प्रथमेश गायकवाड आदींनी केले.


**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**
**माथेरान, ता. कर्जत, जिल्हा- रायगड. ४१० १०२**
**ई-मेल आयडी :** mcomatheran@gmail.com

**जावक क्र. मागिनप: ६०० : २०२५-२६** **दिनांक: १३/०८/२०२५**

**जाहीर सूचना**

माथेरान गिरीस्थान नगरपरिषद, हद्दीतील दस्तुरी नाका येथे कृष्ण-कमळ वेल लागवड करणे प्रस्तावित आहे. नगरपरिषदेकडे कृष्ण-कमळ वेलीची रोपे उपलब्ध नसल्यामुळे एखाद्या संस्थेची सेवा घेणे आवश्यक असल्याने ईच्छुक पुरवठादाराकडून आवश्यक रोपांची पुरवठा करणे, त्याकरिता आवश्यक खत, माती आणि कृषी पद्धतीने लागवड करणे, लागवडीनंतर दोन महिनेपर्यंत वेल / रोपांचे संगोपन करणे इत्यादी अनुषंगिक कामासाठी क्वोटेशन / दर मागविणेत येत आहेत.

माथेरानमध्ये सर्व कामे मानवी श्रम शक्तीद्वारे करावी लागतात. इच्छुक सेवा पुरवठादार यांनी आपले सर्व बाबीचे दर नमूद करून दर सिलबंद लीफाफ्यात सर्व आवश्यक कागद पत्रासह आजपासून आठ दिवसांत कार्यालयात सादर करावेत.

| अ.क्र | झाडांची रोपे, वेली, यांचे नांव व साईज | परिमाण | खत, माती ई सर्व खर्चासह झाड- रोपे लागवड करून द्यावयाचा दर रु. | सही |
|---|---|---|---|---|
| ०१ | कृष्ण-कमळ वेल. (साईज ३ फुट) | १ नग | | |
| ०२ | कृष्ण-कमळ वेल. (साईज ३/४ फुट कुंडीसह) | १ नग | | |
| ०३ | लागवडीनंतर दोन महिने पर्यंत वेल / रोपांचे संगोपन करणे इत्यादी अनुषंगिक कामे. | | | |
| | | | | |

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**माथेरान गिरीस्थान नगरपरिषद**



**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**मुदतवाढ सूचना**

**ई निविदा सूचना क्र. ३०/२०२५-२०२६ (मुंबई) करीता**

दिनांक २८/०७/२०२५ रोजी दैनिक नवाकाळ, मुंबई, दैनिक मिड डे, मुंबई, दैनिक रामप्रहर, रायगड या वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध झालेल्या वरील ई निविदा सूचनेतील खालील कामांकरीता ई निविदा शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्धतेबाबत मुदतवाढ सूचना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम |
|---|---|---|
| १. | पेण अलिबाग व नागोठाणे पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरुस्ती.... पाणीपुरवठा योजनांसाठी कारखाने कायदा १९४८ नुसार आवश्यक परवाने काढणे. | ₹ १५,२५,०००.०० |

उपरोक्त कामांकरीता निविदा प्रपत्र दिनांक २२/०८/२०२५ पर्यंत शासनाच्या https://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असतील.

ज्या निविदाधारकांनी यापूर्वी आपली निविदा भरली असेल अथवा अपलोड केली असेल, त्यांनी निविदेमध्ये बदल करुन किंवा बदल न करता सदर निविदा पुन्हा भरणे आवश्यक आहे, याची कृपया नोंद घ्यावी, अशा कंत्राटदारांनी शुद्धिपत्रकानंतर जर निविदा पुन्हा भरली नाही अथवा अपलोड केली नाही तर त्यांचा देकार सदर स्पर्धात्मक निविदेतून आपोआप बाद होईल.

सदर निविदा सूचनेत इतर कोणताही बदल करण्यात आलेला नाही.

# भाजपतर्फे नवीन पनवेलमध्ये तिरंगा पदयात्रा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्यसाधून भारतीय जनता पक्षाच्या माध्यमातून संपूर्ण देसभरात तिरंगा पदयात्रेचे आयोजन करून राष्ट्रीय एकतेचा संदेश देण्यात येत आहे. त्यापार्श्वभुमीवर भाजप नवीन पनवेल मंडळाच्या वतीने बुधवारी (दि.१३) तिरंगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेला भाजपचे उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, भाजप नेते बाळासाहेब पाटील आणि पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

खांदा कॉलनीमधील एक्सिस बँक येथून सुरुवात झाली. पुढे छत्रपती शिवाजी महाराज चौक, नवीन पनवेल ब्रीज, तुलशी हाईट, द्वारका स्वीट, अंबे माता मैदान असे मार्गक्रमण करत शिवा काम्प्लेक्सजवळ सांगता झाली. या पदयात्रेत नागरीकांनी तिरंगा हातात घेऊन भारतमातेच्या जयघोष केला.

या वेळी भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष जयंत पगडे, जिल्ह सरचिटणीस प्रकाश बिनेदार, माजी महापौर डॉ. कविता चौतमोल, माजी उपमहापौर सीताताई पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत, एकनाथ गायकवाड, मनोहर म्हात्रे, समीर ठाकूर, तेजस कांडपिळे, माजी नगरसेविका राजश्री वावेकर, वृषाली वाघमारे, सुशीला घरत, माजी नगराध्यक्ष संदीप पाटील, माजी उपनगराध्यक्ष गणेश पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, भिमराव पोवार, किशोर चौतमोल, जगदीश घरत, अभिषेक भोपी, देवराम शार्दुल, वरुन डांगर, विवेक होन, मयुर कदम, अक्षय सिंग यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरीक उपस्थित होते.

# गव्हाण विद्यालय प्रांगणात ध्वजारोहण

## हर घर तिरंगा अभियानाचा जल्लोष



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

हर घर तिरंगा अभियानांतर्गत बुधवारी (दि.१३) रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेज तसेच जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या येथील मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत जुनिअर कॉलेज ऑफ सायन्स या दोन्ही विद्यालयांच्या संयुक्त विद्यमाने गव्हाण विद्यालयाच्या प्रांगणात तिरंगा ध्वज फडकावून या अभिनयात उत्साहाने सहभाग नोंदविण्यात आला.

ध्वजारोहण समारंभात विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन अरूणशेठ भगत यांचे शुभहस्ते ध्वजारोहण झाले. या वेळी विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे जेष्ठ सदस्य अनंता ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, युवा नेते मयुर कदम, गव्हाण विद्यालयाच्या मुख्याध्यापिका ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, मोरू नारायण म्हात्रे विद्यालयाच्या प्राचार्या सायली वडवलकर, पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, गव्हाण विद्यालयाच्या ज्युनिअर कॉलेजचे विभागप्रमुख संजय उगले, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, राजेंद्र चौधरी, माणिक घरत, करूणा तांडेल, अर्चना पाटील, अविनाश कजबजे तसेच दोन्ही विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आज आणि उद्या कार्यक्रम

मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या वतीने गुरुवारी (दि.१४) ध्वजारोहण होणार असून मुख्य समारंभ १५ ऑगस्ट रोजी सालाबादप्रमाणे विद्यालयाचे आधारस्तंभ व रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण सकाळी विद्यालयाच्या प्रांगणात होणार असल्याची माहिती गव्हाण विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर यांनी दिली.

# पनवेल पालिकेतर्फे शाळांमध्ये रांगोळी, चित्रकला स्पर्धा




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

घरोघरी तिरंगा-हर घर तिरंगा मोहीम १५ ऑगस्ट पर्यंत विविध उपक्रमाच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबवली जात आहे. याच मोहिमेचा एक भाग म्हणून शिक्षण अधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनानुसार व नियोजनानुसार पनवेल महानगरपालिकेच्या सर्व शाळांमध्ये बुधवारी (दि.१३) सकाळी ध्वजारोहण करण्यात आले.सर्व शाळांमध्ये रांगोळी आणि चित्रकला स्पर्धा घेण्यात आल्या.

स्वातंत्र्य दिनावर आधारित रांगोळी स्पर्धेमध्ये इयत्ता पहिली ते आठवी च्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून पानाफुलांचा व रांगोळीचा वापर करून रांगोळ्या काढल्या प्रत्येक शाळेतून प्रत्येक वर्गातून रांगोळी स्पर्धेतून व चित्रकला स्पर्धेतून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक काढण्यात आले.

इयत्ता पहिली ते चौथीसाठी स्वातंत्र्य दिनावर आधारित रंगभरण स्पर्धा घेण्यात आली व इयत्ता पाचवी ते आठवीसाठी चित्रकला स्पर्धा घेण्यात आली. प्रत्येक शाळेतून प्रत्येक वर्गातून चित्रकला स्पर्धेतून प्रथम, द्वितीय व तृतीय असे तीन क्रमांक काढण्यात आले

कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांनी सांस्कृतिक विभाग समिती, सर्व मुख्याध्यापक, शिक्षक वृंद व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# लोखंडी वजने चोरणारे त्रिकुट पोलिसांच्या ताब्यात

**पनवेल :** साई गाव येथील असेनदास पनवेल एफ.टी. डब्ल्यू. झेड. प्रा.लिमी. कंपनीचे फ्री ट्रेड वेअरहाउसींग झोन मध्ये ठेवण्यात आलेली बीओएफएल बॅटरीचे महागडे सेल व ४० लोखंडी वजने चोरणाऱ्या त्रिकुटास पनवेल तालुका पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

या संदर्भातील तक्रार पोलीस ठाण्यात दाखल होताच पोलिसांनी तीन आरोपींना गुन्ह्यात वापरलेल्या मारुती गाडीसह ताब्यात घेऊन जवळपास ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला.

# महागणपतीच्या दर्शनासाठी गर्दी

**उरण : प्रतिनिधी**

श्रावण महिना व्रतवैकल्यांच्या सणांचा महिना. या महिन्यात अंगारकी संकष्टी चतुर्थीचा योग मंगळवारी (दि.१२) रोजी आल्याने, उरण तालुक्यातील चिरनेर येथील श्री महागणपती मंदिरात गणेश भक्तांची मोठ्ठी झाली होती. चिरनेरचा स्वयंभू श्री महागणपती हा भक्तांच्या नवसाला पावणारा असल्याने, अंगारकी चतुर्थीच्या निमित्ताने मंगळवारी हजारोंच्या संख्येने आलेल्या भाविकांनी प्राचीन श्री महागणपतीच्या दर्शनाचा लाभ घेतला.काल १२ ऑगस्ट रोजी पहाटे ३:३० वाजता प्रथम श्री महागणपतीची महापूजा करण्यात आली. त्यानंतर मंदिर भाविकांना दर्शनासाठी खुले करण्यात आले.

पहाटेपासूनच महागणपतीच्या दर्शनासाठी गणेश भक्तांनी रांगा लावल्या होत्या. मंगळवारी अंगारकी चतुर्थीचा योग आल्याने उरण, पनवेल, पेण तालुक्यासह, नवी मुंबई, ठाणे,मुंबई, डोंबिवली विभागातील हजारो गणेश भक्तांनी दर्शनासाठी पहाटेपासूनच गर्दी केली होती.

दर्शनासाठी भाविकांची रिघ लागल्याने अधिक वेळ लागत होता, मात्र भाविकांनी रांगेत घेणे पसंत केले होते.तर भाविकांना सुयोग्य रितीने दर्शन घेता यावे, यासाठी चिरनेर गणपती देवस्थानच्या वतीने चोख व्यवस्था करण्यात आली होती.

# एमएनएम विद्यालयात दहीहंडी उत्सव



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण संस्थेच्या मोरु नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्साहवर्धक वातावरणात जल्लोषात दहीहंडी म्हणजेच गोपाळकाला उत्सव साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाची सुरुवात शाळेच्या मुख्याध्यापिका सौ सायली वडवलकर यांच्या हस्ते दहीहंडी पूजनाने करण्यात आली. प्राथमिक आणि माध्यमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी, शिस्तबद्ध पद्धतीने मानवी मनोरे तयार करत ढोल ताशा व पारंपारिक गीतांच्या सुरात गोविंदा आला रे असा जयघोष करत दहीहंडी फोडली. दरम्यान, पूर्व प्राथमिक विभागाच्या विद्यार्थ्यांनी पारंपारिक पोशाखात राधा व कृष्ण यांच्या वेशभूषा साकारल्या. सकाळपासून सर्व विद्यार्थ्यांमध्ये प्रचंड उत्साह दिसून येत होता.

शाळेतील विद्यार्थ्यांना दही पोहे व फळांचा प्रसाद देण्यात आला. शाळेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागाच्या पर्यवेक्षिका प्रणिता गोळे, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी गोपाळकाला उत्सवात प्रत्यक्ष सहभाग घेतला.

# सीकेटी कॉलेजमध्ये युवा मानसरंग क्लबतर्फे कार्यशाळा

## मास्टरींग द पॉवर ऑफ पॉझिटीव्हीटी कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चांगु काना ठाकूर आर्टस्, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, न्यू पनवेल ( स्वायत्त) येथे ६ ते ८ ऑगस्ट २०२५ रोजी युवा मानसरंग क्लब च्या वतीने मास्टरींग द पॉवर ऑफ पॉझिटीव्हीटी हा कार्यक्रम झाला. ह्या कार्यक्रमाची सुरुवात युवा मानास्रंग संवादक तर्फे आमंत्रित पाहुणे एम.डी. इन कम्युनीटी मेडिसिन डॉ. दीपक पाटील व मानसोपचारतज्ज्ञ डॉ. शुभांगी डेरे पाटील, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील व समुपदेशन विभागाच्या प्रमुख स्वाती परब यांच्या स्वागताने झाली. मानसरंग संवादक श्रेया, प्रज्ञा, सिद्धी यांनी हि जबाबदारी पार पडली.



ह्या तीन दिवसीय कार्यशाळेची सुरवात प्रमुख पाहुणे डॉ. दीपक पाटील यांनी 'आम्ही सकारात्मकतेने कनेक्ट होत आहोत' ह्या विषयाने केली. ह्यामध्ये निरीक्षण कौशल्य, गैर-न्यायिक वृत्ती तसेच आपण कोल्हा बनून प्रतिक्रिया द्यायची की जिराफ बनून शांत राहून प्रश्न सोडवायचा असे त्यांनी सांगितले. दुसऱ्या व तिसर्या दीवशी प्रो. डॉक्टर शुभांगी डेरे -पाटील यांनी जीवनात येणारे तणाव (बौन्सिंग बॅक टू लईफ) हाताळायचे बरेच कौशल्य जसे 'पर्मा मॉडेल, मेडीटेशन कौशल्य, आधारभूत कौशल्य, गोल सेटिंग, वेळेचे प्रभावी नियोजन' शिकवण्यात आले. त्याचबरोबर कार्यशाळेच्या तिसर्या दिवशी पॉझिटीव्ह मी या सत्रामध्ये शेवटी चार लाइव केसेस - चार गटांना देण्यात आलया व त्यांना ह्या तीन दिवसात शिकलेली कौशल्य व युक्त्या तुम्ही वापरून ह्यामधून काय सोल्युशन काढणार हे सादरीकरण करावयास सांगितले. या कार्यशाळे मार्फत जीवन जगण्यास उपयुक कैशाल्ये शिकण्यास मिळाली, असा प्रतिसाद विद्यार्थ्यांकडून मिळाला.

या कार्यक्रमासाठी बॅचलर ऑफ मॅनेजमेंट स्टडीज विभागाच्या प्रा.डॉ. भाग्यश्री भोईर, फॅशन आणि डिझायनिंग विभागाच्या प्रा. सुचित्रा गवळे, इंटेरिअर डिझायनिंग विभागाच्या ए. आर. प्रज्योती देसाई, माहिती तंत्रज्ञान विभागाच्या प्रा. सोनाली हुद्दार, बॅचलर अकाउंटिंग ऑफ फायनान्स प्रा. करण कोळी , संगणक विज्ञान विभागाच्या प्रा. भाग्यश्री दामले, फॅशन आणि डिझायनिंग विभागाच्या विभागप्रमुख प्रा.दीपश्री राठोड, इंटेरिअर डिझायनिंग विभागाच्या प्रा. स्वेच्छा गोसावी व ७३ विद्यार्थी यांनी सहभाग घेतला होता.

कार्यक्रमाची सांगता मानास्रंग संवादक -विद्यार्थी वर्ग सदफ, निशा, हर्ष आणि प्रज्ञा यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. एस. के. पाटील यांचे ही संधी दिल्याबद्दल आभार मानत केली तसेच समुपदेशन विभागाच्या प्रमुख स्वाती परब यांनी सर्वांचे आभार मानत कार्यक्रमाची सांगता केली.

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात युवा महोत्सव विजेत्यांचा सत्कार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील विविध शाखेतील विद्यार्थ्यांनी रविवारी (दि.१०) कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर कॉलेज, कर्जत येथे पार पडलेल्या ५८व्या युवा महोत्सवात विविध स्पर्धांमध्ये उत्तम कामगिरी केली होती.

या युवक महोत्सवात कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आपली कला व कौशल्याचे प्रभावी प्रदर्शन करत अनेक पारितोषिके पटकावली त्यामध्ये प्रामुख्याने मेंहदी स्पर्धा - तृतीय क्रमांक - मेहेक माहिमकर (तृतीय वर्ष बी.एस्सी.) रांगोळी स्पर्धा - द्वितीय क्रमांक - शरयू नाईक (प्रथम वर्ष बी.एम.एस.) कथा सांगणे (गट ब) - तृतीय क्रमांक - आलिया ठाकूर (प्रथम वर्ष बी.एस्सी.) शास्त्रीय वाद्य (तालविनायक) - द्वितीय क्रमांक - कैवल्य शिंदे (द्वितीय वर्ष बी.ए.एफ.) यावेळी महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी विजेत्यांना प्रमाणपत्र व पारितोषिक देऊन गौरवण्यात आले व त्यांचे अभिनंदन केले.



विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे सर्व पदाधिकारी, शिक्षकवृंद व पालकांनी त्यांचे अभिनंदन केले. ही यशस्वी कामगिरी विद्यार्थ्यांच्या मेहनत, मार्गदर्शन व कला-कौशल्याचा उत्तम समन्वय असल्याचे महोत्सव संयोजकांनी सांगितले.

या सर्व विजेतांना सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. डॉ. दीपिका हसीजा, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. प्रमोद वाघे, प्रा. तनुजा सुमन, प्रा. शिवानी मानकामे, प्रा. शितल चव्हाण, प्रा. शिवानी सोनकर, प्रा. नीलम मोरे, प्रा. करिष्मा कडव व प्रा. शुभांगी ठाकूर तसेच इतर सर्व प्राध्यापक यांचे ह्या ५८व्या युवा महोत्सवासाठी मोलाचे मार्गदर्शन मिळाले.

दरम्यान, या महाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी विविध उपक्रम राबविले जातात. त्यांना उत्स्फूर्त प्रतिसाद लाभतो.

# गव्हाण-कोपर विद्यालयात आनंददायी शनिवार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज आ भगत ज्युनिअर कॉलेज गव्हाण कोपर मध्ये बहीण-भावाच्या पवित्र नात्याचा सण 'रक्षाबंधन' तसेच अखिल जीवसृष्टीचे किंबहुना सर्व सृष्टीचे संरक्षण करणाऱ्या झाडांबद्दल सद्भावना व्यक्त करण्यासाठी वृक्षबंधन (वृक्षरक्षाबंधन) समारंभ आणि आनंददायी शनिवार उत्साहात झाला.



विद्यालयाच्या प्राचार्या तथा रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या ज्योत्स्ना ठाकूर यांचे हस्ते संस्थेचे बोधचिन्ह असलेल्या वटवृक्षास राखी बांधून वृक्षसंवर्धनाचा संकल्प व वृक्षांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या वेळी उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व जनरल बॉडी सदस्य रवींद्र भोईर, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख संजय उगले, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र म्हात्रे, सागर रंधवे, इयत्ता ९वी ड च्या वर्गशिक्षिका चारूशीला ठाकूर, ज्येष्ठ ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी, माणिक घरत, करूणा तांडेल, अर्चना पाटील, डॉ.अॅड.सुवर्णा किर्लोस्कर, माध्यमिक विभागाच्या सारिका ठाकूर, गीतांजली म्हात्रे, वृषाली म्हात्रे, संपदा म्हात्रे, माधुरी म्हात्रे, दर्शना माळी, प्रतिज्ञा घरत, विद्या पाटील, उज्वला म्हात्रे, निलिमा ठाकूर, सुजाता चौधरी, मोनिका बाबर, संगणक शिक्षिका ज्योत्स्ना कोळी, सोनाली घरत व दर्शना भोईर आदी उपस्थित होते.

या वेळी शनिवार माझ्या आवडीचा या उपक्रमांतर्गत वर्गातील विद्यार्थिनींनी आपल्या वर्ग बंधूंना स्वहाताने तयार केलेल्या राख्या बांधून बंधुभावाचे वैश्विक व शाश्वत मांगल्य जपणारा हा सण उत्साहात साजरा केला.

नृत्याविष्कार सादर करणाऱ्या विद्यार्थीनी आणि वाद्यवृंदातील सहभागी विद्यार्थ्यांना प्रतिज्ञा घरत, ज्युनिअर कॉलेज शिक्षक राजेंद्र चौधरी व करूणा तांडेल, दर्शना माळी आणि कनिष्ठ लेखनिक चंद्रकांत मढवी यांनी रोख रकमेची पारितोषिके देवून प्रोत्साहित केले. वर्गशिक्षिका चारुशीला ठाकूर यांच्या नियोजनांतर्गत रक्षाबंधन व वृक्ष रक्षाबंधन या कार्यक्रमाचे सुंदर नियोजन केले होते. सूत्रसंचालन एच.आर.पाटील व विशांत ठाकूर यांनी तर आभार पर्यवेक्षिका शशिकला पाटील यांनी मांडले.

रामप्रहर

## श्रावणधारा

### माझा रसेश्वर...

श्रावणाच्या तिसऱ्या सोमवारी
गेलो माझ्या रसेश्वराला !
दर्शन घेतले आशीर्वाद मागितला
माझ्या भोळ्या शंकराला..
माझा रसेश्वर तर
जणू भोळा शंभर !
साथ लाभते त्यांची
पाठी असतो तो ईश्वर..
एकटाच असतो नदीकिनारी
रक्षणकर्ता रसायणीचा !
त्यांच्याच प्रेरणेने
विकास झाला परिसराचा..
माझा रसेश्वर सदैव
देतो शांती मनाला !
त्यांचीच प्रेरणा आशीर्वाद
लाभतात संकटी भक्ताला...



-अनिल दाभाडे, रसायनी

## खडई धनगरवाडा, करंबेळी ठाकूरवाडीतील आदिवासींचा वनवास संपणार

# रस्त्यासाठी वन जमीन प्रस्तावास मंजुरी

**खोपोली : प्रतिनिधी**





खालापूर तालुक्यातील खडई धनगरवाडा आणि करंबेळी ठाकूरवाडीतील आदिवासींच्या रस्त्यासाठी आवश्यक वन जमिनीचा प्रस्ताव अखेर वन विभागाकडून मंजूर केल्यामुळे मागील चार वर्षे सातत्यपूर्ण पाठपुरावा करणाऱ्या ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेच्या प्रयत्नांना मोठे यश आले आहे. यामुळे येथील दोन्ही आदिवासीवाड्यांतील आदिवासी बांधव-भगिनींचा पिढ्यान्‌पिढ्यांचा वनवास संपणार आहे.

मुंबईपासून अगदी काही अंतरावर असलेल्या रायगड जिल्ह्याच्या खालापूर तालुक्यामधील खडई धनगरवाडा आणि करंबेळी ठाकूरवाडीतील ग्रामस्थ स्वातंत्र्याच्या सत्याहत्तर वर्षांनंतरही रस्ता, पाणी यासारख्या मूलभूत सुविधापासून वंचित आहेत. यासाठी प्रस्ताव सादर करूनही खालापूर वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय आणि रायगड जिल्हा परिषदेच्या बांधकाम उपविभाग कार्यालयातील अधिकाऱ्यांच्या समन्वयाअभावी तीन वर्षे वारंवार अनेक प्रकारच्या त्रुटी निघून परिपूर्ण प्रस्ताव मंजुरीसाठी पाठवण्यात आला नव्हता तसेच खालापूर तहसील कार्यालयानेही दोन वर्षांपूर्वी ग्राम संवर्धन सामाजिक संस्थेचे अध्यक्ष संतोष ठाकूर यांना या रस्त्याबाबत तत्काळ निर्णय घेण्यात येईल असे लेखी लिहून दिल्यानंतरही कारवाई करण्यास निष्क्रियता दर्शवल्यामुळे यादोन्ही वाड्यांना रस्त्यासारखी मूलभूत सुविधा मिळू शकली नव्हती.

यानंतर पुन्हा एकदा सामाजिक कार्यकर्ते संतोष ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली संतोष घाटे, यशवंत माडे, पांडू हिरवा यांच्यासह दोन्ही आदिवासी वाड्यांतील आदिवासी बांधवांनी बेमुदत आमरण उपोषण सुरू केले व जोपर्यंत वन जमीन स्थान करण्याच्या प्रक्रियेस मान्यता मिळत नाही तोपर्यंत उपोषण न सोडण्याचा निर्णय घेतला. अखेर खालापूरचे तहसीलदार अभय चव्हाण यांनी संबंधित सर्व विभागांची संयुक्त बैठक घेत प्रशासकीय अधिकाऱ्यांचे एकमेकांमध्ये असलेल्या समन्वयामुळे आदिवासींना मूलभूत सुविधा मिळण्यास विलंब होत असल्याचे सांगत खालापूर वन परिक्षेत्र अधिकारी रा.जी.प.बांधकाम अभियंते, खालापूर गट विकास अधिकारी व संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्यांची जबाबदारी स्पष्ट करीत आठ दिवसांची कालमर्यादा ठरवून उपोषणकर्त्यांना लेखी आश्वासन देत उपोषण मागे घेण्याची विनंती केली होती.

रायगड जिल्हा उपवनसंरक्षक यांनी या वाड्यांच्या वन जमीन प्रस्तावास मंजुरी दिल्याने उजळोली ते करंबेळी ठाकूरवाडीच्या रस्त्यासाठी प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून सुमारे दीड कोटी रुपयांचे कार्यारंभ आदेश ठेकेदार यांनी याअगोदरच घेतले असल्यामुळे पुढील काही दिवसांतच या दोन्ही वाड्यांच्या रस्त्याचा प्रश्न मार्गी लागून सत्याहत्तर वर्षांचा वनवास संपणार आहे. आदिवासींच्या मूलभूत हक्कांच्या लढाईमध्ये सक्रिय पाठिंबा देणारे राजकीय पक्षांचे नेते, कार्यकर्ते,सामाजिक संस्था, संघटनांचे प्रतिनिधी, खाणाव व खरिवली ग्रामपंचायतिचे पदाधिकारी यांच्यासह वेळोवेळी आंदोलनांची दखल घेऊन वृत्तपत्रांमध्ये बातमी प्रसारित करणारे पत्रकार बंधू यांचे आभार व्यक्त करताना खालापूर तालुक्यात अजूनही १६ आदिवासी वाड्या अशाच परिस्थितीत आहेत, त्यांच्यासाठी पुढे येऊन न्याय देण्यास सहकार्य करण्याचे आवाहन संतोष ठाकूर यांनी केले आहे.

# 'उबाठा'चा जिल्हाधिकारी कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न पोलिसांनी हाणून पाडला



**अलिबाग : प्रतिनिधी**

शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने सोमवारी (दि. ११) रायगड जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. शिवसैनिकांनी जिल्हाधिकारी कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी तो हाणून पाडला.

रायगडमधील ठाकरे गटाच्या शिवसैनिकांनी सोमवारी दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढला. अलिबाग येथील शिवसेना मध्यवर्ती कार्यालयापासून हा मोर्चा दुपारी जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निघाला. जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ हिराकोट तलाव येथे पोलिसांनी बॅरीगेटींग करून रस्ता अडवला होता. आक्रमक शिवसैनिकांनी ते हटवून जिल्हाधिकारी कार्यालयाकडे कूच केले. या वेळी पोलीस आणि शिवसैनिकांमध्ये झटापट झाली. पुढे शिवसैनिक जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात घुसण्याचा प्रयत्न करत असतानाच पोलिसांनी दरवाजे लावून घेत त्यांना रोखले.

या वेळी पोलीस आणि शिवसैनिकांमध्ये जोरदार झटापट झाली. जादा कुमक मागवून शिवसैनिकांचा जिल्हाधिकारी कार्यालयात घुसण्याचा प्रयत्न पोलिसांमनी हाणून पाडला.

शिवसेना उपनेते बबन पाटील यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन करण्यात आले. माजी आमदार मनोहर भोईर, शिवसेना जिल्हाप्रमुख सुरेंद्र म्हात्रे, शिरीष घरत, नंदकुमार शिर्के, सल्लागार सतीश पाटील, उपजिल्हाप्रमुख अविनाश म्हात्रे, महिला आघाडीच्या रायगड जिल्हा संघटका दीपश्री पोटफोडे, स्वीटी गिरासे आदींसह प्रमुख पदाधिकारी, शिवसैनिक आंदोलनात सहभागी झाले होते.

# खोपोली खालापूर संघर्ष समितीचे महावितरणला निवेदन



**खोपोली : प्रतिनिधी**

अनियमित विद्युत पुरवठा व स्मार्ट मीटरसंदर्भात खोपोली खालापूर संघर्ष समितीने डॉ. शेखर जांभळे यांच्या नेतृत्वाखाली महावितरण कार्यालय खोपोली येथे कार्यकारी अभियंता निवेदन देत कारभार सुधारण्याची मागणी केली आहे.

खोपोली शहरात सातत्याने विद्युत प्रवाह खंडित होत आहे. त्यामुळे सणासुदीच्या तोंडावर नागरिक विशेषत: व्यापारीवर्गाचे प्रचंड प्रमाणात नुकसान होत आहे. या अगोदर कायमस्वरूपी उपाययोजना करु, असे महावितरणाकडून सांगण्यात आले होते, पण त्यात सुधारणा झाली नाही.

खोपोलीमध्ये अनेक ठिकाणी कुठल्याही प्रकारची पूर्वसूचना न देता स्मार्ट मीटर लावण्याचे काम सुरू झाले आहे. यामुळे देखील नागरिक संभ्रमात आहेत. खोपोली खालापूर संघर्ष समितीने मंगळवारी याबाबतचे निवेदन दिले असून स्मार्ट मीटर बसविताना कुठल्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास याची संपूर्ण जबाबदारी आपली असेल, असा इशारा डॉ. जांभळे यांनी दिला आहे.

## जेएसडब्ल्यू कंपनीच्या डेप्युटी मॅनेजरपदी अनुराग पाटील

**नागोठणे : बातमीदार**

पेण तालुक्यातील गडब येथील जेएसडब्ल्यू स्टील लि. कंपनीच्या डेप्युटी मॅनेजरपदी (प्रोजेक्ट) तरुण, होतकरू इंजिनिअर अनुराग सुनील पाटील (अमळनेर, जि जळगाव) यांची नियुक्ती झाली आहे. पदोन्नतीबरोबर पाटील यांची कंपनीच्या सौजन्याने पवई येथील आयआयटी कॉलेजमध्ये एमटेकच्या शिक्षणासाठीदेखील निवड झाली आहे.



अनुराग पाटील यांची काही वर्षांपूर्वी एमआयटी पुणे कॉलेजमधून कॅम्पसद्वारे इंटरव्हू देऊन जेएसडब्लू कंपनीत ग्रॅज्युएट ट्रेनि इंजिनीअर (बीटेक मेकॅनिकल) म्हणून नियुक्ती झाली. त्यानंतर त्यांची टेक्निकल ऑफिसर, असिस्टंट मॅनेजर व डेप्युटी मॅनेजर म्हणून पदोन्नती झाली. त्यांचे एमटेक करण्याचे स्वप्न होते. अनुराग यांनी शिक्षणासाठी वेळोवेळी स्कॉलरशिप मिळविली नोकरीसह ते पुढील शिक्षण घेत आहेत.

# खासदार तटकरेंच्या वाढदिवसानिमित्त गणवेश, शालेय साहित्याचे वाटप

**रोहा : प्रतिनिधी**

खासदार सुनील तटकरे यांच्या वाढदिवसानिमित्ताने रोहा शहरात गटनेते माजी महेंद्र गुजर यांच्या नियोजनातून प्रेरणा बहुवीकलांग शाळेमध्ये ३८ विद्यार्थ्यांना ३८ शूज व ७६ गणवेश वाटप करण्यात आले.

या कार्यक्रमास गुजर यांच्यासह माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र जैन अहमद दर्जी, योग प्रशिक्षक विभा चोरगे, दर्शना आठवले, रवींद्र चाळके, मजिद पठाण, अजित मोरे, हर्षदा गुजर, विनीत वाकडे, श्री. मोरे, आसावरी मोकल, माज सवाल, संतोष कडव, सानिका सावंत, अकील रोहावाला आदी उपस्थित होते.

या वेळी दर्शना आठवले, योग प्रशिक्षक विभा चोरगे, स्वप्नील धनवडे यांनी मनोगत व्यक्त केले. या वेळी शाळेतील विद्यार्थी व शिक्षक उपस्थित होते.



# मोरे महाविद्यालयाची ग्रंथपाल दिनानिमित्त क्षेत्रभेट

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुक्यातील एम.बी. मोरे फाऊंडेशनच्या कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय धाटाव येथे १२ ऑगस्ट रोजी ग्रंथालय शास्त्राचे जनक डॉ. एस.आर. रंगनाथन यांची जयंती ग्रंथपाल दिनानिमित्त क्षेत्रभेट आयोजित करण्यात आली. या क्षेत्रभेटीत महाविद्यालयाच्या प्रा. योगिता बराटे आणि ७४ विद्यार्थीनी उपस्थित होत्या.

यानिमित्ताने रोह्यातील प्रसिद्ध भाटे वाचनालयाला मोरे महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी भेट देऊन तेथील ग्रंथसंग्रहाची माहिती घेतली. वाचनालयाचे अध्यक्ष गजानन मयेकर यांनी अत्यंत मनोरंजकपणे विद्यार्थिनींना वाचनाची आवड कशी लावायची, रोज वाचन केल्याने आपला शब्दसंग्रह वाढून संप्रेषण कौशल्य कसे सुधारते यांसह विविध बाबींवर मार्गदर्शन केले.

भाटे वाचनालयाचे सचिव किशोर तावडे तसेच ग्रथंपाल आरती धारप यांनी कथा, कादंबरी, शब्दकोष ,चरित्रात्मक ग्रंथ, ललितसहित्य, बाल साहित्य ई-संग्रहाची माहिती दिली. महाविद्यालयाच्या ग्रंथपाल सौ. निर्मला थोरात यांनी या प्रसंगी भाटे वाचनालयाला दोन पुस्तके भेट दिली.



# माणगावात नेत्र शिबिरास नागरिकांचा प्रतिसाद

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल आणि उद्योजक विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि. १३) मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात नेत्ररोगतज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ९८ जणांची तपासणी करून ३२ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली. हे शिबिर हे दर महिन्याच्या एका बुधवारी होत असते.



शिबिर यशस्वी करण्यासाठी शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलचे टीम व्यवस्थापक डॉ. पाटील, डॉ. श्रुती मोहन, ओंकार पाटील, गुरुनाथ घुटे, प्राप्ती मोरे, विजय बामणे तसेच सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा यांनी सहकार्य करीत विशेष परिश्रम घेतले.

माणगावात गेली दोन वर्षांहुन अधिक काळापासून ३८ वेळा शंकरा आय हॉस्पिटल व मेथा चॅरिटेबल ट्रस्ट यांच्यातर्फे मोफत नेत्ररोग व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात आतापर्यंत २८३५हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

# भाऊ डिके, संज्योत पडवळ शेतकरी पुरस्काराने सन्मानित

**धाटाव : प्रतिनिधी**

गोपाळवट येथील प्रगत शेतकरी भाऊ डिके, कुडली येथील महिला आदर्श शेतकरी संज्योत पडवळ यांना रायगड प्रेस क्लबच्या शेताच्या बांधावर शेतकरी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, शेताच्या बांधावर शेतकऱ्यांचा सन्मान हा रायगड प्रेस क्लबचा अनोखा उपक्रम असल्याचे गौरवद्गार उपस्थित मान्यवरांनी काढले आहे.





रोहा प्रेस क्लब आयोजित रायगड प्रेस क्लबच्या शेतकऱ्यांच्या बांधावर शेतकऱ्याचा सन्मान कार्यक्रमाचे गोपाळवट, कुडली येथील कार्यक्रमात प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड, तालुका कृषी अधिकारी महादेव करे, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ मनोज तलाठी, अ. भा. मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सिटीझन फोरमचे अध्यक्ष आप्पा देशमुख, उपाध्यक्ष राजेंद्र जाधव, शेतकरी प्रतिष्ठानचे अध्यक्ष गणेश भगत, प्रेस क्लबचे अध्यक्ष सुहास खरीवले, संघटक शशिकांत मोरे, दीपक फाउंडेशनचे प्रकल्प समन्वयक अनिकेत निकम, बिजामृतचे चेअरमन भारत पाटील, शेतकरी चंद्रकांत लोखंडे, अँड बापूसाहेब पडवळ, पत्रकार महेंद्र दुसार, डॉ चव्हाण, ग्रामसेविका पुजा रंगारी, प्रेस क्लबचे पदाधिकारी, कृषी सहयोगी संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

प्रगतशील शेतकरी भाऊ डिके यांचा प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड व मान्यवरांच्या हस्ते रायगड प्रेस क्लब शेताच्या बांधावर पुरस्काराने सन्मानीत केले तर कुडली येथील कृषी पर्यटक शेतकरी संज्योत पडवळ दाम्पत्यांचा अ भा मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख डॉ मनोज तलाठी, कृषी अधिकारी महादेव करे व मान्यवरांच्या हस्ते आदर्श शेतकरी म्हणून सन्मान करण्यात आला. भाऊ डिके यांनी कुक्कुट, खेकडा पालन, भाजीपाला, नाचणी व अन्य पिके घेऊन शेतीतला आदर्श अधोरेखीत केला. संज्योत पडवळ यांनी पपई लागवड, हळद, मस्य शेती, दुग्ध व्यवसाय यांसह कृषी पर्यटनात मोठी भरारी घेतली. दोन्ही शेतकऱ्यांचा कृतिशील शेतकरी म्हणून यथोचित सन्मान करण्यात आला.

प्रांताधिकारी ज्ञानेश्वर खुटवड यांनी शेती विकू नका, हाती काहीच लागणार नाही. जैविक शेती तंत्रज्ञान स्विकारून शेतीचा पोत सुधारा, अन्यथा पुढील पिढी आपल्याला माफ करणार नाही असे वास्तव खुटवड यांनी मनोगत व्यक्त केले. कुडली येथील कार्यक्रमात कृषी अधिकारी महादेव करे, अनिकेत निकम यांनी उपस्थित शेतकऱ्यांना मौलिक मार्गदर्शन केले. शेतकरी संज्योत पडवळ ह्या शेती कृषी पर्यटन क्षेत्रात रोल मॉडल म्हणून पुढे येत आहेत, त्यांनी कृषी पर्यटन व्यवसायात कलात्मक व रुचकर पद्धतीने अधिक रोजगार शोधावा असे कृषी विज्ञान केंद्राचे डॉ मनोज तलाठी यांनी मनोगतातून व्यक्त केले. शेतकरी, पत्रकार व शेती सबंधी क्षेत्रातील लोकांनी एकत्र येऊन चर्चासत्रासारखे कार्यक्रमाचे आयोजन करावे, अशी सूचना मिलिंद अष्टीवकर यांनी केली. यावेळी राजेंद्र जाधव यांनी हा शेतकरी सन्मान उपक्रम एक चळवळ होऊ पाहत आहे, अशी अपेक्षा प्रास्ताविकात व्यक्त केली. सन्मान कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी रोहा प्रेस क्लबच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# डीएनएस बँकेतर्फे खोपोली पोलीस ठाण्यात रक्षाबंधन

**खोपोली : प्रतिनिधी**

रक्षाबंधन या स्नेहबंधांच्या सणानिमित्त डीएनएस बँकेतर्फे खोपोली पोलीस ठाण्यात एक विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमात बँकेच्या महिला कर्मचारी व सदस्यांनी पोलीस बांधवांना राखी बांधून त्यांना मिठाई देत सणाचा आनंद साजरा केला.



रक्षाबंधन हा भाऊ-बहिणींच्या नात्याचा सण आहे. या सणावेळी बहीण भावाच्या हाताला राखी बांधते. समाजाच्या रक्षणासाठी अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस दलालाही या नात्यात सामील करण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. कार्यक्रमात डीएनएन बँकेचे स्थानिक शाखा व्यवस्थापक, कर्मचारीवर्ग आणि पोलीस ठाण्यातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. पोलीस अधिकारी-कर्मचारी यांनी या उपक्रमाचे स्वागत केले व डीएनएस बँकेचे आभार मानले.

# वनडे क्रमवारीत गिल अव्वल स्थानी!

## रोहितने बाबरला टाकले मागे; श्रेयस अय्यरही टॉप १०मध्ये

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने (आयसीसी) जाहीर केलेल्या ताज्या एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत भारतीय खेळाडूंचे निर्विवाद वर्चस्व दिसून आले आहे. शुबमन गिलने आपले अव्वल स्थान कायम राखले असून कर्णधार रोहित शर्माने पाकिस्तानच्या बाबर आझमला मागे टाकत दुसरे स्थान पटकावले आहे.

आयसीसीच्या ताज्या फलंदाजी क्रमवारीत भारतीय फलंदाजांची कामगिरी लक्षवेधी ठरली आहे. एकदिवसीय फलंदाजांच्या यादीत गिल पहिल्या क्रमांकावर विराजमान असताना, रोहित शर्माने बाबर आझमला मागे टाकले. बाबरला एका स्थानाचे नुकसान झाल्याने तो दुसऱ्या स्थानावरून तिसऱ्या स्थानावर घसरला आहे. वेस्ट इंडिजविरुद्धच्या तीन एकदिवसीय सामन्यांच्या मालिकेतील खराब कामगिरीचा फटका बाबरला बसला.

दुसरीकडे एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत श्रेयस अय्यरने पहिल्या १० खेळाडूंमध्ये आपले स्थान कायम राखले असून तो आठव्या स्थानी आहे. यासह अव्वल १० फलंदाजांमध्ये गिल, रोहित, विराट कोहली आणि श्रेयस अय्यर अशा चार भारतीय खेळाडूंचा समावेश आहे. विराट या क्रमवारीत




चौथ्या स्थानावर आहे.

टी-२० फलंदाजांच्या क्रमवारीत भारताचा सलामीवीर अभिषेक शर्मा अव्वल स्थानी कायम आहे, तर तिलक वर्माने एका स्थानाची झेप घेत दुसरे स्थान मिळवले आहे. भारतीय कर्णधार सूर्यकुमार यादव सहाव्या स्थानावर कायम असून यशस्वी जैस्वालला एका स्थानाचे नुकसान झाले आहे. तो अव्वल १०मधून बाहेर पडून ११व्या स्थानी पोहोचला आहे.

आयसीसीच्या कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीमध्ये, यशस्वी जैस्वाल पाचव्या, तर ऋषभ पंत आठव्या स्थानावर आहे. भारतीय कसोटी संघाचा कर्णधार शुनमन गिल १३व्या स्थानी आहे. कसोटी क्रमवारीत इंग्लंडचा जो रूट पहिल्या, हॅरी ब्रूक दुसऱ्या, न्यूझीलंडचा केन विल्यमसन तिसऱ्या तर ऑस्ट्रेलियाचा स्टीव्ह स्मिथ चौथ्या स्थानावर आहे.

### सांघिक क्रमवारीत भारत अव्वल

एकदिवसीय सांघिक क्रमवारीत भारतीय संघाने अव्वल स्थान अबाधित राखले आहे, तर पाकिस्तानचा संघ पाचव्या स्थानी आहे. न्यूझीलंड दुसऱ्या आणि ऑस्ट्रेलिया तिसऱ्या क्रमांकावर आहे. या क्रमवारीत श्रीलंका चौथ्या, दक्षिण आफ्रिका सहाव्या, इंग्लंड आठव्या आणि वेस्ट इंडिजचा संघ नवव्या स्थानी पोहचला आहे.

# ॲथलेटिक्स मीटमध्ये जिंदल विद्यालयाचे यश

**मुरूड : प्रतिनिधी**

कोल्हापूर येथील संजय घोडावत इंटरनॅशनल स्कूलमध्ये नुकत्याच झालेल्या सीबीएसई ॲथलेटिक्स क्लस्टर मीट २०२५-२६मध्ये एकूण १८२ शाळांच्या खेळाडूंमध्ये अत्यंत उत्साही आणि चुरशीच्या स्पर्धा रंगल्या. या भव्य मीटमध्येत साळाव येथील जिंदल विद्यामंदिराच्या खेळाडूंनी चमकदार कामगिरी केली.

बारावी विज्ञान शाखेतील सेजल प्रदीप मंडल हिने उंच उडीमध्ये रौप्यपदक व १०० मीटर धावण्याच्या स्पर्धेत कांस्यपदक मिळवले. तिची उंच उडीसाठी सीबीएसई नॅशनल ॲथलेटिक्स मीटमध्ये निवड झाली करणार आहे.

इस्माईल असीम मुकदम (बारावी



विज्ञान) याने थाळीफेकमध्ये कांस्यपदक, तर सौद जलील मुकदम (बारावी विज्ञान) याने भालाफेक कांस्यपदक पटकावले.

शाळेचे प्राचार्य मुकेश ठाकूर यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल समाधान व्यक्त करत त्यांचे अभिनंदन केले. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष पंकज मलिक यांनीही खेळाडूंना शुभेच्छा दिल्या.

# पनवेल, खारघर, विचुंबे येथे तिरंगा यात्रा












# ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पारंपरिक देशी क्रीडा महाकुंभाचे उद्घाटन

**मुंबई : प्रतिनिधी**

पारंपरिक देशी खेळाडूंना शिव छत्रपती पुरस्कार, शासकीय लाभ आणि नियुक्त्यांबाबत शासन स्तरावर प्रयत्न करणार असल्याचे आश्वासन क्रीडा आणि युवक कल्याणमंत्री ॲड. माणिकराव कोकाटे यांनी कुर्ला येथे ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव पारंपरिक देशी क्रीडा महाकुंभ उद्घाटन कार्यक्रमात दिले.

ऑलिम्पिकवीर खाशाबा जाधव यांच्या नावाने दरवर्षी पारंपरिक खेळांच्या स्पर्धा शासकीय पातळीवर झाल्या पाहिजेत, असे मत कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी व्यक्त केले.

मंत्री ॲड. कोकाटे आणि मंत्री लोढा यांच्या प्रमुख उपस्थितीत या क्रीडा महाकुंभचे उद्घाटन आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर देशी खेळांच्या मैदानाचे लोकार्पण करण्यात आले. भारतीय परंपरा आणि सांस्कृतिक वारसा जपणाऱ्या देशी मैदानी खेळांच्या खेळाडूंना शासकीय लाभ मिळण्याबाबतची मागणी मंत्री लोढा यांनी केली होती.

मान्यवरांच्या उपस्थितीत या वेळी लाठीकाठी, मल्लखांब आणि तलवारबाजी य साहसी खेळांच्या प्रात्यक्षिक ही सादर करण्यात आले. क्रीडा महाकुंभ येत्या २२ ऑगस्टपर्यंत असणार असून २० हजार स्पर्धक १८ विविध देशी खेळांच्या माध्यमाने मैदान गाजवणार आहेत. कार्यक्रमाच्या शेवटी व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाचे सह संचालक नितीन निकम यांनी उपस्थित मान्यवर आणि खेळाडूंचे आभार व्यक्त केले.


लोकनेते मा. खासदार श्री रामशेठ ठाकूर साहेब यांच्या अमृत महोत्सवी वर्षा निमित्त

श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आयोजित







भजन परंपरेला प्रोत्साहन देण्यासाठी भजन स्पर्धेचे आयोजन!
रायगडमधील सर्व भजनी मंडळांनी या उपक्रमात सहभागी व्हावे!

शनिवार दिनांक २३ ऑगस्ट २०२५ आणि रविवार दिनांक २४ ऑगस्ट २०२५.
वेळ - सकाळी ९.०० ते सायं. ७.००
स्थळ - श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ हॉल, प्लॉट नं. ४७५, मार्केट यार्ड, पनवेल.

**प्रवेश अर्ज**

१) भजन मंडळाचे नाव ____________________
२) भजन स्पर्धक मंडळाचा पत्ता ____________________
____________________
३) संपर्क क्रमांक ____________________
४) गायकाचे नाव ____________________
५) मृदंग वादकाचे नाव ____________________
६) तबला वादकाचे नाव ____________________

प्रवेश अर्ज स्वीकारण्याची अंतिम तारीख १५ ऑगस्ट २०२५.

पुरुष खुलागट - महिला खुलागट

| प्रथम पारितोषिक | द्वितीय पारितोषिक | तृतीय पारितोषिक | उत्तेजनार्थ पारितोषिक |
|---|---|---|---|
| ५१,०००/- सन्मानचिन्ह | २५,०००/- सन्मानचिन्ह | १५,०००/- सन्मानचिन्ह | ७,०००/- सन्मानचिन्ह |
| | उत्कृष्ट पखवाज वादक ७,०००/- सन्मानचिन्ह | उत्कृष्ट तबलावादक ७,०००/- सन्मानचिन्ह | |

स्पर्धा संपन्न झाल्यानंतर लगेचच स्पर्धेचा निकाल जाहीर करून बक्षीस वितरण करण्यात येणार आहे.

अधिक माहितीसाठी संपर्क

सागर राजे - ९२२४३४४१३६, नारायण बुवा पाटील - ७७१५८३५४२४, उमेश बुवा चौधरी - ९३२४८२४२०५, चंद्रकांत मने - ९७६८६५६४८४, विनोद तोडेकर - ७०४५८२२५४८, जगदीश म्हात्रे ९३२६८१२१९६, पुनमताई ठाकूर - ७२०८७७६००५, पवन राजे - ९२२१०९७३३७, अभिषेक पटवर्धन - ९०२९५८०३४३, अनिल कोळी - ९१६७४७४५०७, मच्छिंद्र पाटील - ९००४०४८६३, डॉ. शैलेश वाजेकर - ९८६७२९६८५०

**स्पर्धेची नियमावली**

१) भजन स्पर्धा प्राथमिक फेरी आणि अंतिम फेरी अशा दोन टप्यात होईल.
२) प्राथमिक फेरी हि ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येईल.
३) प्राथमिक फेरीतून निवड झालेल्या सर्वोत्तम पुरुष १५ व महिला १५ स्पर्धक भजन मंडळींना अंतिम फेरीसाठी आमंत्रित करण्यात येईल.
४) प्राथमिक फेरीत भाग घेण्यासाठी २ ते ३ मिनिटांचा साउंड सिस्टिम न वापरता शुटींग केलेला नॉन एडिटेड व्हिडीओ 9167474507 या नंबरवर व्हॉट्सअप करावा. सदर व्हिडिओ आणि मंडळाची माहिती (मंडळाचे नाव, सहभागी कलाकारांची नावे इत्यादी, भजन स्पर्धेच्या किमान सात दिवस अगोदर पाठवावी).
५) अंतिम फेरीत निवड झाल्यावर प्रत्यक्ष सादरीकरण करताना मुख्य गायक-वादकांसह कमीत कमी ६ जणांचा आणि जास्तीत जास्त १२ जणांचा समावेश असावा.
६) अंतिम फेरीत भजन सादरीकरणासाठी फक्त २० मिनिटांचा निर्धारित वेळ असणार आहे.
७) श्लोक, भजन, एक अभंग आणि एक गौळण सादर करणे आवश्यक आहे.
८) सादरीकरणासाठी घेतलेले अभंग आणि गौळण हे संताचेच असावेत. (रचलेले अभंग, स्वरचित काव्य, गौळण, भक्तिगीत चालणार नाहीत) अभंग सादरीकरण करताना फिल्मी चालीत अभंग गाऊ नये,
९) निवड झालेल्या मंडळींनी निर्धारित वेळेच्या एक तास अगोदरच उपस्थित राहणे आवश्यक आहे.
१०) व्यासपीठावर बसण्याच्या अगोदरच आपापली वाद्ये सुरात मिळवून ठेवावीत. फक्त आवाज तपासून घेण्यासाठी ५ मिनिटांचा वेळ देण्यात येईल.
११) स्पर्धेसाठी लागणारे साहित्य आणि वाद्ये आपण स्वतःची आणावी.
१२) तबला, पेटी, टाळ, पखवाज हे चार आणि कोरस तीन असे एकूण ७ जण असावेत.
१३) प्राप्त परिस्थितीनुसार कार्यक्रमात फेरबदल करण्याचा आयोजकांना अधिकार राहिल.
१४) परिक्षकांचा निर्णय अंतिम आणि बंधनकारक राहिल. परिक्षकांबरोबर कोणत्याही कारणाने वाद घालता येणार नाही.
१५) आवश्यक असल्यास इतर काही नियम कार्यक्रम स्थळी समजविण्यात येतील.
१६) प्राथमिक फेरीत भाग घेतल्यानंतर फोन करुन विचारणा करु नये. अंतिम यादी प्रसारीत करण्यात येईल.
१७) स्पर्धेतील गायक, वादक, चकवा वादक किंवा कोणतेही कोरस दुसऱ्या मंडळात सहभागी होवू शकणार नाही.
१८) पारंपारिक भजनातील साहित्याचा वापर करता येईल. (इलेक्ट्रॉनिक तानपु-याचा वापर करावयास हरकत नाही.)
१९) भजन सादरीकरण करताना पारंपारिक पोषाख असावा.

सुचनाः भजन स्पर्धेत सहभागी झालेल्या मंडळाचे सादरीकरण कसे झाले याबद्दल परिक्षक LIVE समिक्षा करतील. तसेच सहभागी झालेल्या कलाकारांना योग्य त्या प्रतिक्रिया आणि आवश्यक असल्यास सुचना करतील, जेणेकरुन त्यांना प्रोत्साहन मिळेल, शिवाय निकाल देताना पारदर्शकता जपता येईल.


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com